सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३२ | अंक २९५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### राम मंदिरात गर्दी वाढली

**नवी दिल्ली :** अयोध्येतील राम मंदिराला आता दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतासह जगभरातून कोट्यवधी भाविक रामचरणी नतमस्तक झाले. अयोध्येत येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. रामललाचे दर्शन घेण्याची आस आजही भाविकांमध्ये असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे आता राम मंदिरात सेवा करणारे पुजारी आता तीन पाळ्यांमध्ये काम करणार असल्याचे म्हटले जात आहे. अयोध्येतील राम मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभ हस्ते राम मंदिरावर धर्म ध्वजारोहण करण्यात आले. राम मंदिर पूर्ण झाल्यावरही लाखो भाविक प्रभू श्रीरामांचे दर्शन घेण्यासाठी अयोध्येत येत आहेत. रामनगरी अयोध्येत प्रभू श्रीरामांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांचा ओघ वाढला आहे. राम मंदिर आणि हनुमानगढी येथे भाविकांची वाढलेली संख्या लक्षात घेता, प्रशासनाला दर्शन व्यवस्थेत बदल करावे लागले आहेत.

### महापौरांना ७५ हजार वाहन भत्ता

**विरार :** वसई-विरार महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना नियमानुसार विविध सोयीसुविधा पुरविल्या जाणार आहेत. महापौर यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता म्हणून दर महिन्याला ७५ हजार रुपये दिल्या जातील. तसेच उपमहापौर यांना ६५ हजार, स्थायी समिती सभापती ५५ हजार, विरोधी पक्षनेता आणि सभागृह नेत्याला ५० हजार, तर इतर सर्व सभापतींना वाहन प्रतिपूर्ती भत्ता म्हणून प्रत्येक महिन्याला ४५ हजार रुपये दिले जाणार आहेत.स्थानिक स्वराज्य सस्थांमध्ये ग्रामपंचायत सरपंचांपासून, नगराध्यक्ष, जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर अशा सर्व लोकप्रतिनिधींना त्यांच्या अडीच किंवा पाच वर्षांच्या कालावधीत मानधन तसेच विविध सोयी सुविधा देण्यात येतात.

### तिन्ही गांधींविरुद्ध रायबरेलीत तक्रार

**रायबरेली :** काँग्रेस नेते राहुल गांधी आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाविरोधात उत्तर प्रदेशमधील रायबरेलीमध्ये न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. यामध्ये राहुल गांधींसोबत सोनिया गांधी व प्रियंका गांधी यांचेही नाव आहे. सरकारी जमिनीचा गैरवापर केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.पाजा फाउंडेशन या संस्थेने हा खटला दाखल केला आहे. सरकारी जमीन व तलावाच्या जागेवर चुकीच्या पद्धतीने इमारत बांधण्यात आली, असा दावा त्यांनी केला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे एका शाळेसाठी मान्यता घेतल्याचाही आरोप आहे. या प्रकरणात गांधी कुटुंबाने मदत केल्याचे याचिकेत म्हटले आहे. या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत न्यायालयाने पोलिसांकडे सविस्तर अहवाल मागवला आहे.

### लोकल पकडणं बेतलं जीवावर

**बदलापूर :** सकाळची प्रचंड गर्दीची वेळ आणि प्रत्येक जण वेळेवर लोकल पकडून कामावर वेळेवर जाणयासाठी धावपळ करत असतो. पण हीच धावपळ, हीच गर्दी एका नवविवाहितेच्या जीवावर बेतली आहे. सकाळची ८ वाजून ११ मिनिटांचीची सीएसएमटी ट्रेन आणि बदलापूर स्टेशनवर जमलेली प्रचंड गर्दी, प्रत्येक जण ट्रेन पकडण्यासाठी घाई करत होतेआणि अश्यातच २८ वर्षीय चेतना चंद्रशेखर देवरुखकर ही तरुणी सुद्धा ट्रेन पकडण्याच्या धावपळीत होती, काही कारणास्तव ट्रेन पकडायला तिला उशीर झाला. अन् ट्रेन स्टेशनवरून सुटली, तीच सुटलेली ट्रेन पकडण्यासाठी चेतना प्रयत्न करत होत्या. याच प्रयत्नात त्यांच्या तोल गेला आणि त्या ट्रेनखाली आल्या यात त्यांच्या दुर्दैवी मृत्यु झाला.

## राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून

# सुनेत्रा पवारांचा शपथविधी संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि. ३१ जानेवारी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेली राजकीय पोकळी भरून काढत राष्ट्रवादी काँग्रेसने नेतृत्वाची सूत्रे त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या हाती दिली. विधिमंडळ गटनेतेपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर शनिवारी सायंकाळी पाच वाजता सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. मुंबईतील लोकभवन येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व्यासपीठावर



उपस्थित होते. शपथविधी दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी ‘अजितदादा अमर रहे’ आणि ‘महाराष्ट्राचा एकच वादा, अजितदादा’ अशा घोषणा देत अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ यांच्यासह विधानसभेतील आणि विधानपरिषदेतील पक्षाचे सर्व ४८ आमदार उपस्थित होते. सहा वेळा उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळलेल्या अजित पवारांचा राजकीय वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आता सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर आली आहे. दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर शनिवारी दुपारी विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. बैठकीच्या सुरुवातीला प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शोक प्रस्ताव मांडून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर दिलीप वळसे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांचे नाव गटनेतेपदासाठी सुचवले, तर या प्रस्तावाला छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सर्व आमदारांनी या प्रस्तावाला समर्थन दिले.

सुनेत्रा पवार यांच्या निवडीचा ठराव विधानसभेतील आणि विधानपरिषदेतील अशा एकूण ४८ आमदारांच्या सह्यांनी मंजूर करण्यात आला. या बैठकीत दोन ठराव संमत करण्यात आले असून, पहिल्या ठरावानुसार त्यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली, तर दुसऱ्या ठरावानुसार पक्षनेता म्हणून निवड करण्यास मान्यता देण्यात आली. या दोन्ही ठरावांना एकमताने संमती मिळाल्याने सुनेत्रा पवार यांच्याकडे पक्षाचे सर्वाधिकार आले आहेत.

गटनेतेपदी निवडीची अधिकृत पत्रे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि अन्य वरिष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच विधिमंडळ सचिवालयाकडे सादर केली. गटनेतेपदी निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला असून, तो उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. सुनेत्रा पवार यांनी बारामती मतदारसंघातून २०२४ ची लोकसभा निवडणूक लढवली होती; मात्र त्यात त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर त्यांची राज्यसभेवर नियुक्ती झाली होती.

## आज देशाचा अर्थसंकल्प



**नवी दिल्ली :** अर्थमंत्री निर्मला सीतारमण १ फेब्रुवारी रोजी २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर करतील. अर्थसंकल्पात सुरू केलेल्या घोषणा आणि नवीन योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपने एक योजना आखली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यावेळी सत्ताधारी पक्षाने अर्थसंकल्पाबाबत व्यापक प्रचार मोहीम आखली आहे, जेणेकरून अर्थसंकल्पातील घोषणा आणि धोरणे थेट सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवता येतील.

भारतीय जनता पक्षाने अर्थसंकल्पाच्या प्रचारासाठी एक सविस्तर आराखडा तयार केला आहे. १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान देशव्यापी अर्थसंकल्प मोहीम सुरू करण्याची भाजपची तयारी आहे. यासाठीच पक्षाने २०२६ च्या अर्थसंकल्पीय मोहिमेची योजना आखली आहे. पार्श्वभूमीवर १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातील.

या काळात सर्व केंद्रीय मंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री आणि पक्षाचे वरिष्ठ नेते वेगवेगळ्या ठिकाणी पत्रकार परिषदा घेतील आणि अर्थसंकल्पातील मुख्य मुद्दे जनतेसमोर मांडतील. भाजपने देशभरातील अंदाजे १५० ठिकाणी पत्रकार परिषदा घेण्याची योजना आखली आहे. या कार्यक्रमांद्वारे सरकार अर्थसंकल्पातील ठळक मुद्दे आणि अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी उचललेल्या पावलांवर प्रकाश टाकेल.

याव्यतिरिक्त, सोशल मीडियाला या मोहिमेचा एक महत्त्वाचा भाग बनवण्यात आले आहे.

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचा पक्का निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**बारामती, दि. ३१ जानेवारी :** सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबाबत माहिती नसल्याचं सांगत शरद पवारांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर पार्थ पवारांनी त्यांची भेट घेतली. या भेटीनंतर पवार कुटुंबाने राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याचा मोठा निर्णय घेतला असून सर्व गैरसमज दूर झाल्याचं सांगण्यात आलं आहे.

एकीकडे सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी आज मुंबईत होत असतानाच दुसरीकडे आपल्याला याविषयी माहिती नाही किंवा विश्वासात घेतलेलं नाही, असं सांगून ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज सकाळी राज्याच्या राजकारणात खळबळ उडून दिली होती. त्यानंतर विविध तर्क-वितर्क लढवले जात असताना पार्थ पवार हे शरद पवारांना भेटायला गेले. या दरम्यान झालेल्या बैठकीत काय तपशील होता, हे सुरुवातीला कळू शकले नाही. त्यानंतर पार्थ पवार हे काहीही न बोलता बैठकीतून निघून गेले. काही वेळानंतर आमदार रोहित पवार आणि युगेंद्र पवार एकाच गाडीतून आले. मात्र तेदेखील काहीही न बोलता निघून गेले. परंतु त्यानंतर एक तासानंतर महत्त्वाची माहिती समोर आली असून पार्थ पवारांच्या भेटीने सर्व चित्र पालटलं असून पवार कुटुंबाने राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची माहिती विद्या प्रतिष्ठानचे विश्र्वस्त आणि दिवंगत अजित पवार यांचे अत्यंत विश्र्वासू अशी ओळख असलेल्या किरण गुजर यांनी दिली आहे.किरण गुजर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पार्थ पवार यांनी आज शरद पवार यांच्यासह पवार कुटुंबाच्या घेतलेल्या भेटीत त्यांना शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण दिले. शपथविधी सोहळ्यावरून जे समज-गैरसमज झाले होते, ते दूर करण्यात आले आहेत आणि पवार कुटुंबाने राजकीदृष्ट्या एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे, असा दावा गुजर यांनी केला आहे.

## कल्याण-डोंबिवलीत महापौर-उपमहापौर बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**कल्याण, दि. ३१ जानेवारी :** कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीनंतर महापौर निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले असून महापौर पद अनुसूचित जमातीसाठी राखीव झाले आहे. या महापौर पदासाठी शिवसेनेच्या वतीने नगरसेविका हर्षाली चौधरी थवील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, तर उपमहापौर पदासाठी भाजपच्या वतीने नगरसेवक राहुल दामले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

कल्याण-डोंबिवली महापालिका मुख्यालयात पालिका सचिव किशोर शेळके यांच्याकडे हे दोन्ही उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, मनसेचे माजी आमदार राजू पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, भाजपचे जिल्हा अध्यक्ष नंदू परब, नरेंद्र सूर्यवंशी आदी पदाधिकारी उपस्थित होते. महापौर आणि उपमहापौर पदासाठी अर्ज दाखल करण्याचा शुक्रवारी शेवटचा दिवस होता. मात्र दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकाच उमेदवाराचे अर्ज दाखल झाल्याने, या महत्त्वाच्या पदांवरील निवडणुकीचा निकाल जवळपास निश्र्चित झाला आहे. त्यामुळे येत्या ३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेतील निवडणूक प्रक्रिया ही केवळ औपचारिकता ठरणार आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागून असून, नव्या महापौर आणि उपमहापौरांच्या नेतृत्वाखाली शहराच्या विकासाला आणखी गती मिळेल, असा विश्र्वास खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. कडोंमपा निवडणुकीमधून नवनिर्वाचित झालेल्या सदस्यांपैकी एकाची महापौर पदी, तर दुसऱ्याची उपमहापौरपदी निवड करण्यासाठी विभागीय आयुक्त कोकण भवन यांनी जिल्हा अधिकारी मुंबई शहर आंचल गोयल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




## अर्चक पुरोहितांनी आरोग्य तपासणीसाठी वेळ व मुहूर्त काढणे आवश्यक - वे.शा.सं. कृष्णकांत मुळे गुरुजी

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ जानेवारी :** आरोग्यम् धन संपदा ही आपल्या संस्कृतीतील अत्यंत महत्वाची म्हण आहे. धन आणि संपदा म्हणजेच आपले आरोग्य. ज्या प्रकारे अर्चक पुरोहित यजमानांना योग्य कार्यासाठी मुहूर्त व वेळ काढून देतात, त्याचप्रमाणे त्यांनी स्वतःच्या आरोग्य तपासणीसाठीही वेळ आणि मुहूर्त काढणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन ज्येष्ठ पुरोहित वेदशास्त्रसंपन्न कृष्णकांत मुळे गुरुजी यांनी केले.

ते विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम, अखिल भारतीय पुरोहित महासंघ व जे. जे. प्लस हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत अध्यक्ष संजय गायकवाड, विश्र्व हिंदू परिषद नैतिक शिक्षण क्षेत्र संपर्कप्रमुख संजय आप्पा बारगजे, वे.शा.सं. अनिरुद्ध देशमुख, जे.



जे. प्लस हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. जीवन राजपूत, तसेच मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार अखिल भारतीय पुरोहित महासंघ अध्यक्ष मंदिर आयाम खडकी भाग सहप्रमुख श्री पद्मनाथ चौधरी गुरुजी आणि पुरोहित संघटनेचे अध्यक्ष श्री विश्वास नागापूरकर गुरुजी उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. जीवन राजपूत यांनी सांगितले की, आजचा हा उपक्रम जरी केवळ अर्चक पुरोहितांसाठी असला तरी यापुढे वर्षभर अर्चक पुरोहितांच्या कुटुंबीयांसाठी बी.पी., शुगर, आर.बी.सी., डोळे तपासणी, कान-घसा तपासणी, तसेच फिजिओथेरपी अशा विविध तपासण्या मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

त्याचप्रमाणे अँजिओप्लास्टी, बायपास, कॅन्सर, प्रोस्टेट यांसारख्या आजारांवरील शस्त्रक्रिया किरकोळ शुल्कात करून देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ज्याप्रमाणे प्रत्येकाचा फॅमिली डॉक्टर असतो, त्याचप्रमाणे सर्व अर्चक पुरोहितांसाठी जे. जे. प्लस हॉस्पिटल हे फॅमिली दवाखाना आहे. त्यामुळे हक्काने दवाखान्यात येऊन आवश्यक ती सर्व ट्रीटमेंट घ्यावी, असे आवाहनही डॉ. राजपूत यांनी केले.

उद्घाटनप्रसंगी उपस्थित माननीय संजय आप्पा बारगजे व माननीय संजय गायकवाड यांनीही आपल्या मनोगतातून आरोग्यदृष्ट्या जागरूकतेचे महत्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजीव जहागीरदार यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री शिवाजी दहिवाळ यांनी मानले. सूत्रसंचालन वे.शा.सं. श्रावण फडे गुरुजी यांनी केले.

या मोफत शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुनील जाधव (बालरोगतज्ञ), डॉ. मनोहर वाकळे (डायबेटोलॉजिस्ट), डॉ. संदीप घोराले, तसेच श्री हरिनारायण जी, श्री योगेश खरात, श्री प्रदीप देशमुख, श्री पद्मनाभ चौधरी गुरुजी, श्री जयंत जोशी गुरुजी, श्री राधेश्यम कुलकर्णी, श्री सुयोग जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### जियो-बिपीच्या इंजिन-क्लिनिंग ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी पेट्रोलचे अनावरण

**छत्रपती संभाजीनगर :** पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री, मा. श्री. हरदीप सिंग पुरी यांनी आज गोवा येथे होत असलेल्याइंडिया एनर्जी वीक २०२६ मध्ये जिओ-बीपी (रिलायन्स इंडस्ट्रीज आणि बीपी यांच्यासंयुक्त उद्योगाचा रिलायन्स बीपी मोबिलिटी लिमिटेड चा कार्यरत ब्रँड,) येथे क्रांतीकारी 'ॲक्टिव्ह' टेक्नॉलॉजीचेपेट्रोलचे अनावरण केले. जिओ-बीपी येथील 'ॲक्टिव्ह'टेक्नॉलॉजीचे पेट्रोल इंजिनचे महत्त्वाचे भाग स्वच्छ करण्यासाठी, प्रभावी स्वच्छता क्षमता देण्यासाठी, इंजिनची कार्यक्षमता पूर्ववत करण्यासाठी आणि त्याचे संरक्षणकरण्यासाठी,तसेच नियमित पेट्रोलच्या तुलनेत वाहनचालकांना दरवर्षी १००किमी* पर्यंत जास्त अंतर पार करण्यास मदत करण्यासाठी याची निर्मीती करण्यात आलीआहे. आणि विशेष म्हणजे, हे सर्व कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय उपलब्ध आहे.

### देवखेळ'मध्ये अंकुश चौधरी आणि प्राजक्ता माळी झळकणार

**छत्रपती संभाजीनगर :** झी५चा नवीन मराठी ओरिजनल देवखेळचे स्ट्रीमिंग आता केवळ मराठी झी-५वर सुरू होत आहे. चित्तवेधक मानसशास्त्रीय गुन्हेगारी थरारपटाची ही मालिका कोकणातील समृद्ध लोकपरंपरेतून प्रेरणा घेते आणि शिमगा (होळी) सणाच्या उत्कंठावर्धक पार्श्र्वभूमीवर श्रद्धा, भीती आणि मानवी विवेक यांच्या नाजूक भावनांचा शोध घेते.रत्नागिरी जिल्ह्यातील देवतालीच्या किनारपट्टीवरील गावावर आधारित, देवखेळचे कथानक एका थरारक परिस्थितीभोवती गुंफले आहे. दरवर्षी, होळी पौर्णिमेच्या रात्री एक मृत्यू होतो. कथाकल्पनेत रमणारे गावकरी या मृत्यूंचे श्रेय शंकासुरला देतात. शंकासूर हे न्यायाचे प्रतीक म्हणून स्थानिक पातळीवर पूजले जाणारे एक पौराणिक लोक व्यक्तिमत्व आहे.

### जेव्हा बाप्पा दिव्य चिंतामणीच्या रक्षणार्थ पुढे येतात

**छत्रपती संभाजीनगर :**सोनी सबवरील 'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय' मालिकेत गणेशाच्या (निर्णय समाधिया) दिव्य प्रवासाचे चित्रण आहे, ज्यामध्ये भगवान गणेशाचा सामना सिंधुरासुराने पसरवलेल्या दुर्गुणांशी होतो. गणेश अष्टविनायक यात्रेतील चिंतामणी अध्यायात प्रवेश करत आहेत. यामध्ये दाखवले आहे की, कशाप्रकारे श्रद्धा, संयम आणि सुजाणता आपल्याला इच्छा, भक्ती आणि नैतिक संतुलनाच्या परीक्षेदरम्यान मार्गदर्शन करतात.

### महाराष्ट्र सरकारकडून 'कॉम्फर्ट' अगरबत्तीवर बंदी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतामध्ये घरगुती कीटकनाशकांच्या सुरक्षित वापरास प्रोत्साहन देणाऱ्या ना-नफा तत्वावरील उद्योग मंडळ होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशन तर्फे बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्ती 'कॉम्फर्ट' विरोधात महाराष्ट्र सरकारने केलेल्या कारवाईचे स्वागत करण्यात आले आहे. 'कॉम्फर्ट' ही डास प्रतिबंधक अगरबत्ती महाराष्ट्र, तमिळनाडू, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथे विक्रीस उपलब्ध असून ती मेसर्स धूप छांव कंपनी यांचे उत्पादन आहे. खुल्या बाजारातून गोळा करण्यात आलेल्या नमुन्यांवरून हे उत्पादन अनभिज्ञ ग्राहकांकडून खरेदी केले जात असल्याचे स्पष्ट झाले असून, महाराष्ट्र कृषी विभागाने केलेल्या प्रयोगशाळा चाचण्यांमध्ये 'कॉम्फर्ट' मध्ये बेकायदेशीर आणि मान्यता नसलेले रसायन डाइमफ्लुथ्रिन आढळून आले आहे. 'कॉम्फर्ट' अगरबत्त्या मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक तसेच उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रात विक्रीस असल्याचे सांगितले जाते.

### हिंदुस्तान झिंकने वेदांत मेटल बाजारात झिंक प्राइस लाँच केले

**मुंबई :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी, जगातील सर्वात मोठे एकात्मिक झिंक उत्पादक आणि जागतिक स्तरावरील पाच शीर्ष चांदी उत्पादकांपैकी एक असलेल्या हिंदुस्तान झिंक लिमिटेडने त्यांच्या प्रमुख मेटल ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, वेदांत मेटल बाजारवर भारतीय रुपयांमध्ये झिंक प्राइस नावाचे लाइव्ह प्राइसिंग मॉड्यूल लाँच करण्याची घोषणा केली.धातूच्या किमतींच्या प्रवेशाचे लोकशाहीकरण करण्यासाठी डिझाइन केलेले, झिंक प्राइस भारतातील व्यवसायांना, विशेषतः एमएसएमई आणि लहान-खंड खरेदीदारांना, जागतिक बेंचमार्कच्या अनुषंगाने भारतीय रुपयांमध्ये पारदर्शक, रिअल-टाइम धातूच्या किमती पाहण्यास, बुक करण्यास आणि लॉक करण्यास सक्षम करते, जे हिंदुस्तान झिंकची अधिक समावेशक, डिजिटली सक्षम आणि स्वावलंबी औद्योगिक परिसंस्था तयार करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

### ३१,३२६ कोटी रुपयांच्या नवीन व्यवसाय प्रीमियमची नोंद

**मुंबई,:** देशातील अग्रगण्य जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाइफ इन्शुरन्सने ३१ डिसेंबर, २०२५ रोजी संपलेल्या कालावधीसाठी ३१,३२६ कोटींचा नवीन व्यवसाय प्रीमियम नोंदवला आहे, तर ३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेल्या याच कालावधीसाठी हा आकडा २६,२५६ कोटी होता. ३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेल्या संबंधित कालावधीच्या तुलनेत नियमित प्रीमियममध्ये १५% वाढ झाली आहे. संरक्षणावर स्पष्ट लक्ष केंद्रित करून, एसबीआय लाइफचा संरक्षण विभागाचा नवीन व्यवसाय प्रीमियम ३१ डिसेंबर, २०२५ रोजी संपलेल्या कालावधीसाठी ३,४११ कोटी होता, ज्यात २२% वाढ नोंदवली गेली. संरक्षण वैयक्तिक नवीन व्यवसाय प्रीमियम ३१ डिसेंबर, २०२५ रोजी संपलेल्या कालावधीसाठी ६५१ कोटी आहे. वैयक्तिक नवीन व्यवसाय प्रीमियम २२,५४५ कोटी असून, ३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेल्या याच कालावधीच्या तुलनेत त्यात १४% वाढ झाली आहे.

# अभिनेता म्हणून जगताना मी स्वत:चाही अभिनय करतो : अभिनेते दिलीप प्रभावळकर

## अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी मांडला आपला जीवनपट

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ जानेवारी :** माझे बहुआयामी व्यक्तिमत्त्व दिग्दर्शकांनी ओळखून त्यांनी मला दरवेळी वेगवेगळ्या भूमिका दिल्या. झपाटलेला चित्रपटातील 'तात्या विंचू', 'लगे रहो मुन्नाभाई'मधील महात्मा गांधी, 'दशावतार'मधील बाबुली मेस्त्री अशा अविस्मरणीय भूमिका मी या दिग्दर्शकांमुळे करू शकलो. त्यांनी माझ्यातला नट शोधत मला भूमिका साकारण्यास मदत केली. विशेषत: मी कोणताही अभिनय करत नसतो त्यावेळी मी स्वतः चाच अभिनय करत असतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी यावेळी केले.

अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ, अष्टपैलू अभिनेते दिलीप प्रभावळकर यांची दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांनी घेतलेली प्रकट मुलाखत रसिकांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाली. या संवादातून प्रभावळकर यांनी आपल्या आयुष्यातील प्रवास, संघर्ष, निर्णयप्रक्रिया, अभिनयाविषयीची भूमिका आणि लेखनाची वाटचाल अत्यंत प्रामाणिकपणे उलगडली.

पुढे बोलताना अभिनेते प्रभावळकर म्हणाले, शाळा आणि महाविद्यालय इतकाच माझा परीघ होता. रुईया महाविद्यालयाच्या 'जनावर' या एकांकिकेसाठी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत पारितोषिक मिळाल्यानंतर अभिनयाविषयीचा आत्मविश्र्वास वाढला. याच काळात लिखाणाचा आत्मविश्र्वासही निर्माण झाला आणि स्वतःला शोधण्याची प्रक्रिया सुरू झाली. मला मुंबईतील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये दाखल होऊन संशोधक व्हायचे होते. मात्र, तिथे मी जाऊ शकलो नाही. त्यानंतर मी फार्मास्युटिकल कंपनीत नोकरी केली; मात्र अभिनयाची ओढ मला कायम होती. कोणतीही सवलत न घेता नोकरी करत असतानाच मी माझा अभिनयाचा प्रवास करीत होतो. वयाच्या चाळिशीनंतर मी पूर्णवेळ अभिनेता होण्याचा निर्णय घेतला.




वृद्ध व्यक्तिरेखा तरुण वयापासून साकारत आलो, असे सांगत अभिनेते प्रभावळकर यांनी दिग्दर्शकांच्या विश्र्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. 'लगे रहो मुन्नाभाई'मध्ये गांधीजींची भूमिका करताना प्रचंड दडपण होते. मी गांधीजींवरील पुस्तके वाचली, भाषणे ऐकली, तयारी केली. लोक मला गांधी म्हणून स्वीकारतील का, अशी भीती होती; मात्र चित्रपट प्रचंड यशस्वी ठरला. या चित्रपटाचे खरे नायक हे दिग्दर्शक राजू हिरानी आहेत. या एका चित्रपटाने त्या काळात देशभर 'गांधीगिरी'ची लाट आली होती.

रंगमंच, चित्रपट आणि माध्यमांच्या भिन्नतेविषयी बोलताना अभिनेते प्रभावळकर म्हणाले, नाटकात प्रमाणबद्धता आवश्यक असते. सिनेमात मी दिग्दर्शकाला शरण जातो; सिनेमा हे दिग्दर्शकाचे माध्यम आहे. महाविद्यालयीन काळातील अनुभवांनी लिखाणाची दिशा मिळाली. प्रकाशक आणि संपादकांनी मला लिहायला प्रवृत्त केले. 'गुगली' हे माझे पहिले पुस्तक असून आजवर मी ३१ पुस्तके लिहिली आहेत.

संवादाच्या शेवटी प्रेक्षकांच्या आग्रहाखातर त्यांनी माऊथ ऑर्गन वाजवून दाखवताना मेहरबां लिखूँ, हसीना लिखूँ या दिलरुबा लिखूँ, हैरान हूँ कि आपको इस ख़त में क्या लिखूँ हे गीत सादर केले.

# बिडकीन येथील ब्लू माउंटन प्री-स्कूलमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ३१ जानेवारी :**पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्थेच्या ब्लू माउंटन प्री-स्कूलमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी बिडकीन पोलीस स्टेशनचे पोलीस जमादार अजित शेकडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती माता व महान पुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते अजित शेकडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात शाळेच्या शिक्षिका ज्योती राठोड यांनी प्रमुख पाहुण्यांचा उपस्थितांना परिचय करून दिला. प्रमुख पाहुणे अजित शेकडे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांनी शिस्त, देशभक्ती व कायद्याचा आदर राखत जबाबदार नागरिक बनावे, असे मार्गदर्शन केले. तसेच पालकांनी आपल्या पाल्यांवर योग्य संस्कार करून त्यांना योग्य मार्गावर चालण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमाला पालकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी कवायत, देशभक्तीपर गीते, नृत्य, भाषणे व नाट्यप्रयोग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. काही विद्यार्थी स्वातंत्र्यसैनिकांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते.



तसेच लिंबू-चमचा, रनिंग, बुक बॅलन्सिंग, बुक कलेक्टिंग, जिक-जॅक रेस अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनिषा जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन रेखा चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षिका मनिषा जाधव, प्रतिक्षा पोटे, ज्योती राठोड, कविता मढिकर, रेखा चव्हाण, नंदिनी चव्हाण तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शोकसंदेश

सोयगाव - महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजितदादा पवार यांच्या निधनाची बातमी कळताच मनाला प्रचंड दुःख झाले.सर्वसामान्य जनतेशी थेट संपर्क व कार्यकर्त्यांना जपणारे महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांपैकी ते एक होते.प्रशासनावर मजबूत पकड असणारे व कार्यकर्त्यांची कामे करणारे नेते म्हणून त्यांची वेगळी ओळख होती.मंत्रालयात कामानिमित्त गेल्यानंतर दादा आपुलकीने विचारपूस करायचे.अजितदादा आज आपल्यात नाहीत यावर विश्र्वास बसत नाही.महाराष्ट्राचं संवेदनशील नेतृत्व हरपल्यामुळे राज्याच्या राजकीय व सामाजिक क्षेत्राची फार मोठी हानी झाली आहे. स्वतःला समाज कार्यात झोकून देणाऱ्या खऱ्या खुऱ्या नेतृत्वाला महाराष्ट्र आज पोरका झाला असून त्यांचा बेधडक व स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा स्थायी स्वभाव होता अशा भावना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोयगाव शहराध्यक्ष रवींद्र काळे यांनी व्यक्त केल्या.



# शालेय आरोग्यासाठी 'एक तास विद्यार्थ्यांसाठी' अभियान

## प्रशासन-वैद्यकीय-शिक्षण यांचा समन्वित उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ जानेवारी :** छत्रपती संभाजीनगर शहरातील विद्यार्थ्यांच्या आरोग्यवर्धनासाठी एक दूरदृष्टीपूर्ण आणि समाजहितकारी सार्वजनिक आरोग्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पना व मार्गदर्शनातून एक तास विद्यार्थ्यांसाठी ही विशेष जनजागृती मोहीम राबवली जात आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), महानगरपालिका आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त सहकार्याने प्रशासन, वैद्यकीय क्षेत्र आणि शिक्षण विभाग यांचा प्रभावी समन्वय साधला गेला आहे.




शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पारस मंडलेचा, खच- अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर, सचिव डॉ. योगेश लक्कास आणि शिक्षणाधिकारी डॉ. अश्र्विनी लाठकर यांच्या सहकार्याने उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

शहरातील विविध शाळांमध्ये डॉक्टर प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांना संतुलित आहार, जंक फूडचे दुष्परिणाम, अन्नपदार्थांचे लेबल वाचन, पोषणमूल्ये, शारीरिक हालचाल आणि मानसिक आरोग्य याबाबत मार्गदर्शन करत आहेत.

IMA चे डॉ. शाहाजी तौर, डॉ. अमोल जोशी, डॉ. जफर बेग, डॉ. मोनिका पाटील, डॉ. आसावरी टाकळकर, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. आरजा आहेर, डॉ. राहुल तळेले, डॉ. चैत्राली खरात, डॉ. प्रशांत चव्हाण, डॉ. शिवाजी पोळे, डॉ. इम्रान खान, डॉ. सुचेता पाठक, डॉ. मंजुषा शेरकर, डॉ. वैशाली भालेराव, डॉ. संभाजी चिंतले, डॉ. सचिन धुळे, डॉ. रेणू बोराळकर, डॉ. नीती सोनी, डॉ. जय तोष्णीवाल, डॉ. दत्तात्रय कदम, डॉ. शैलेश पादरे आदींचा सक्रिय सहभाग आहे.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी सवयी रुजवून दीर्घकालीन सार्वजनिक आरोग्य घडवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे.

## मनपा प्रशासन अडचणीत !

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ जानेवारी :** पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मनपाकडून चार ठिकाणी ११ हजार घरांचे बांधकाम सुरू आहे. घरासाठी यापूर्वी मनपाकडे ४० हजार नागरिकांनी अर्ज केले होते. लाभार्थ्यांना पुन्हा ऑनलाईन अर्ज व अनामत रक्कम भरण्याचे आवाहन मनपाकडून करण्यात आले होते. मात्र . नियोजित वेळेत केवळ ५ हजार १९२ नागरिकांनीच अर्ज केले. त्यामुळे मनपा प्रशासन अडचणीत आले आहे.

## अजितदादांसोबतची आठवणी......



सोयगाव - राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजितदादा पवार सोबत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रंगनाथ नाना काळे यांच्या सोबतचा क्षण

# 'बीज प्रदर्शन' उपक्रमाचा समारोप व बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ जानेवारी :** पर्यावरण संवर्धन क्षेत्रात २०१५ पासून कार्यरत असलेल्या वी...वी फॉर इन्व्हॉर्मेंट या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'बीज प्रदर्शन' उपक्रमाचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा ३ फेब्रुवारी २०२६ रोजी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात होणार असून पद्मश्री मा. चैतरामजी पवार प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

संस्थेच्या अध्यक्षा सौ. मेघना बडजाते यांच्या नेतृत्वाखाली हरित क्षेत्रवाढ, वृक्षसंवर्धन आणि शाश्र्वत जीवनपद्धती यांवर आधारित कार्य सातत्याने सुरू आहे.संस्थेने आतापर्यंत ५ लाखांहून अधिक वृक्षांची लागवड व जोपासना केली आहे. २०२२ मध्ये एका तासात १ लाख वृक्ष लागवडीच्या ऐतिहासिक मोहिमेत संस्थेने सक्रिय सहभाग नोंदवला होता. शहरातील सुमारे १५० किलोमीटर दुभाजकांवर देशी वृक्षांची लागवड व देखभाल केली जाते. राज्यात १० पेक्षा अधिक घनदाट वनप्रकल्प उभारण्यात संस्थेची पुढाकार भूमिका आहे.

'वृक्ष रुग्णवाहिका' हा उपक्रम विशेष उल्लेखनीय ठरला असून, वर्षभर दररोज सकाळी झाडांची निगा, पाणीपुरवठा व नवीन लागवड केली जाते. शालेय रोपवाटिका उपक्रमातून १०० शाळांतील १० हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. 'बीज प्रदर्शन २०२५-२६' अंतर्गत ५० शाळांमध्ये २०० हून अधिक देशी बियाण्यांचे प्रदर्शन भरवून २५ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग झाला.




पुढील वर्षी हा उपक्रम १०० शाळांपर्यंत नेण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे.

या वेळी संस्थेच्या अध्यक्षा सौ. मेघना बडजाते, कार्याध्यक्ष श्री. संजय अंबेकर, डॉ. संजय डांभारे, डीन, शासकिय अभियामत्रिकी महाविद्यालय, श्री युनूस पटेल व श्री किरण मास्ट मुख्याध्यापक संघ उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २५/२०२६.

अर्जदार:-

१) मंगलाबाई अमृत चौधरी, वय. ७० वर्षे, धंदा. घरकाम, २) रविंद्र अमृतराव चौधरी,वय. ४६ वर्षे, धंदा. मजुरी, दोघेही रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

-विरुध्द-

गैरअर्जदार- कोणीही नाही.

प्रकरण :- वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत अमृत रघुनाथ चौधरी हे दि. १४/०१/२०२६ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत अमृत रघुनाथ चौधरी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल.

पुढील तारीख :- ०९/०३/२०२६.

आज दि. २९/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशानुसार

**विभागीय लिपीक**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.)**

**सहायक अधिक्षक**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.)**

# परभणी जिल्हा परिषद निवडणूकीत उमेदवारांच्या प्रचारासाठी वाढल्या कसरती

## प्रचारासाठी मुदतवाढ मिळाल्यानंतर अनेक पक्षाकडून प्रचारासाठी अनेक उपायोजना सुरु

**परभणी,/प्रतिनिधी:** महानगरपालिके प्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीतसुध्दा निवडणूक विभागाच्या ढिम्म कारभारामुळे प्रमुख राजकीय पक्षांसह प्रसार माध्यमेसुध्दा हैराण झाली आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या दोन अडीच महिन्यांपासून निवडणूका सुरु आहेत. परंतु, या निवडणूकीत निवडणूक विभागांतर्गत वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा प्रकर्षाने निदर्शनास येत आहे. विशेषतः नगरपालिका व महानगरपालिका निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रियेत निवडणूक विभागाने उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेपासून ते मतमोजणीच्या टप्प्यापर्यंत सातत्याने उदासिनतेसह हलगर्जीपणा दाखवून दिला. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतरसुध्दा दोन-दोन दिवस निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांना त्या त्या प्रभागांमधून किती अर्ज दाखल झाले. याची अधिकृत माहितीसुध्दा संकलित करीत माध्यमांना पुरविता आली नाहीत. पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या याद्यासुध्दा दोन-दोन दिवस मिळाल्या नाहीत. उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतीम मुदतीनंतर लढतीचं चित्र स्पष्ट झाल्यानंतरसुध्दा तब्बल दोन दिवस रिंगणातील उमेदवारांची यादी मिळाली नाही.




मतमोजणीच्या टप्प्यातसुध्दा माध्यमांच्या प्रतिनिधींना या निवडणूक विभागाने मतमोजणीपासून कोसोदूर ठेवले. प्रतिनिधींवर अनेक बंधने लादली. निवडणूक विभाग ध्वनीक्षेपकाद्वारे जेव्हा मतमोजणीचा निकाल जाहीर करत तेव्हाच माध्यमांच्या प्रतिनिधींना माहिती मिळू लागली होती. तत्पूर्वी ताजे अपडेट द्यावयास निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही तत्परता दाखविली नाही. महापालिका निवडणूकीत हे चित्र प्रकर्षाने दिसून आले. संपूर्ण राज्यातील महापालिकेंतर्गत निकाल जाहीर झाल्यानंतरसुध्दा परभणी महानगरपालिकेंतर्गत मतमोजणीचा निकाल रात्री उशीरा ११ वाजता प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींच्या हाती आला.

जिल्हा परिषद निवडणूकीतसुध्दा ये रे माझ्या मागल्या प्रमाणे तीच गत सुरु आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची बुधवारी दुपारी ३ वाजता मुदत संपल्यानंतरसुध्दा गुरुवारी रात्री ९ वाजेपर्यंत माध्यमांच्या प्रतिनिधींना दाखल केलेल्या उमेदवारांची यादी देण्यात आली नाही. या विभागाकडे वारंवार चौकशी केल्यानंतरसुध्दा स्पष्ट अशी माहिती दिली जात नाही.

एकंदरीत निवडणूक विभागांतर्गत अधिकाऱ्यातील बेजबाबदारपणा, उदासिनपणा तसेच निष्काळजीपणा प्रामुख्याने राजकीय पक्षांसह प्रसारमाध्यमे अनुभवू लागले आहेत. परंतु, साखरझोपेचे सोंग घेऊन बसलेल्या निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांना त्याचे काडीचेही सोयरसुतक नाही, हे वास्तववादी चित्र आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### मतदार दिना निमित्त मानवत शहरात जनजागर रॅली



**मानवत,/प्रतिनिधी-** परभणी येथील मेरा युवा भारत व येथील नगर परिषद कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी दिनांक २५ जानेवारी मतदार दिवस साजरा करून शहरात जणजागर पदयात्रा काढण्यात आली. हि पदयात्रा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक ते मानवत नगर पालिका कार्यालया पर्यंत काढण्यात आली. यावेळी मतदार जनजागर रॅली मध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या विदयार्थीनी पदयात्रेत सामील झाल्या. मानवत तहसिलचे तहसिलदार मा.श्री. पांडुरंग माचेवाड व मानवत नगर परिषदच्या मुख्याधिकारी श्रीमती कोमलताई सावरे यांनी हिरवा झेंडा दाखवला. कार्यक्रमाचा समारोपात मानवत नगर परिषद मध्ये नवीन नोंदणी केलेले मतदारांचे यावेळी स्वागत करण्यात आले तसेच मतदार दिनाची प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व मान्यवराचे आभार प्रदर्शन जिल्हा युवा अधिकारी शशांक रावुला यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती स्नेहाताई वाघमारे, मैथिलीताई जोशी, सुनिताताई वाकळे, स्वप्ना माथवाले, सुनीताताई नाईक, संगीताताई राऊत, सय्यद वसीम , एस. आय. गवारे यांनी परिश्रम घेऊन प्रयत्न केले.

### योगेश देशमुख भोगावकर यांची निवड



**जिंतूर-** तालुक्यातील भोगाव देवी येथील योगेश देशमुख भोगावकर यांची अजितदादा राष्ट्रवादी गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाच्या जिंतूर तालुका अध्यक्षपदी निवड चे पत्र जिंतूर सेलू माजी आमदार विजयराव भांबळे यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिंतूर तालुका अध्यक्ष लक्ष्मण दादा बुधवंत शिव उपस्थित होते योगेश देशमुख यांचे निवड झाल्याबद्दल त्यांच्या मूळ गावी भोगाव येथे फटाके यांच्यातील त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले या यावेळी योगेश देशमुख म्हणाले की जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार विजयराव भांबळे व पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार यांनी माझ्यावर जिम्मेदारी टाकली ती यशस्वीरित्या वार करणार अशी ती म्हणाली व जिल्हा परिषद समिति त जिंतूर तालुक्यातील दहा सर्कल मधील जास्तीत जास्त उमेदवार निवडूनआणण्याचा प्रयत्न करणार असे ते म्हणाले.

### श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन संपन्न



**जिंतूर :-** येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य खंडेराव भिसे, उद्घाटक श्री. रमेशराव भराड तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अनुप सोळंके, प्राचार्य कैलास मुटकुळे व पत्रकार सचिन रायपत्रीवार यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम श्री सोळंके यांनी खेळा प्रती स्नेहभाव निर्माण व्हावा यासाठी उपस्थित विद्यार्थ्यांना शपथ दिली. त्यानंतर उद्घाटक श्री. भराड यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. आपल्या छोटेखानी भाषणात ते म्हणाले की, तुम्हाला येत असलेला कोणताही एखादा खेळ कधी यश शिखरावर नेऊन पोहोचवेल, हे सांगता येत नाही. खेळामुळे बऱ्याच लोकांच्या जीवनामध्ये बदल झालेला आपणास पहावयास मिळतो, तसेच शरीर स्वास्थ्यासाठीही खेळ महत्वपूर्ण आहे. म्हणून आपण खेळाला महत्त्व दिले पाहिजे असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य भिसे यांनी खेळाच्या विविध प्रकारांवर थोडक्यात प्रकाश टाकला आणि स्पर्धेतील खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कृष्णा गजभारे तर आभार प्रदर्शन प्रा. जगदीश सोमानी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मते, प्रा. तळेकर, प्रा.वर्णेकर ,प्रा. कापरे, प्रा. बोराळकर, प्रा. भिसे,प्रा. सोळंके ,प्रा. गणपुरकर, प्रा. लोणे मॅडम, प्रा. माकोडे, प्रा. घुगे, प्रा. पंढरपूरे, प्रा. सोमानी ,प्रा. वाघमारे मॅडम, प्रा काझी, प्रा. वाघ, प्रा आदाबे, श्री. तळेकर, श्री. दहिफळे, श्री पोटेकर, श्री. चव्हाण ,श्री. वट्टमवार, श्री. भवाळे, श्री. जाधव, श्री. देवकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## प्रभूकृपा विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा(स्कूल-डे)



**जिंतूर,/प्रतिनिधी-** वाघी बोबडे येथील प्रभूकृपा माध्यमिक विद्यालयात आज २३ जानेवारी २०२६शुक्रवार रोजी स्वयंशासन दिन(स्कूल डे) संपन्न झाला.

या दिवशी विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शालेय प्रशासन कसे हाताळावे याचे

स्व:अनुभवातून ज्ञान घेतले. अनेक विद्यार्थ्यांनी खेळीमेळीच्या वातावरणात विविध विषय शिकवण्याचा प्रयत्न केला. मुख्याध्यापक ते शिपाई या सर्वांच्या भूमिका चोखपने पार पाडण्याचा प्रयत्न केला. परिपाठापासून सुरुवात करत राष्ट्रगीत गायनाने समारोप केला.

यामध्ये मुख्याध्यापकाची भूमिका युवराज आव्हाड, उपमुख्याध्यापक गणेश तिथे, लिपिक विठ्ठल गलांडे, शिपाई गणेश बोबडे , दत्ता राऊत यांच्यासह सर्वच विद्यार्थ्यांनी आपापल्या तासीकांमध्ये दैनंदिन शैक्षणिक कार्य पार पडले. या स्वयंशासन दिनाचे नियोजन वर्गशिक्षक श्री गजानन पाटील सर यांनी केले. शालेय प्रशासन एका दिवसासाठी कसे चालते तेव्हा कुठल्या विद्यार्थ्यांनी आपली भूमिका चांगली निभावली याचे मुख्याध्यापक संतोष साखरे सर व सर्व वर्गशिक्षक मंडळींनी निरीक्षण केले...

## जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत अबोली देशमुख प्रथम



**जिंतूर,/प्रतिनिधी-** नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त भारतीय बालविद्या मंदिर प्रशाला परभणी येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जिजामाता विद्यालय जिंतुर येथील अबोली अभिजीत देशमुख हिने प्रथम क्रमांक पटकावला.

कै. नरेश कुचेरिया, कै. कैलासजी अबोटी व कै. डॉ. प्रवीणचंद्र वर्मा स्मृती जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन भारतीय बाल विद्या मंदिर प्रशाला, ममता नगर, परभणी येथे ता.२३ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत जिजामाता विद्यालय जिंतूर येथील अबोली अभिजीत देशमुख हिने माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक मिळवला. यावेळी उपशिक्षणाधिकारी गोविंद मोरे यांच्या हस्ते तिला २१०१ रुपये सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. तिच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक मनोहर कदम, संस्थेचे अध्यक्ष ब्रिजगोपाल तोष्णीवाल, सचिव रमन तोष्णीवाल, संचालिका पद्मा तोष्णीवाल यांनी अभिनंदन केले आहे.

## प्रशिक्षणास गैरहजर, ५३ कर्मचारी यांना नोटीस

**पालम,/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ पालम च्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी मा. विद्या मुंढे-केंद्रे मॅडम व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मा. कैलास चंद्र वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान अधिकारी यांचे पहिले प्रशिक्षण यशस्वीरीत्या संपन्न झाले. सदरील प्रशिक्षणास ५३ गैरहजर कर्मचारी यांना नोटीस बजविण्यात येऊन पुढील प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

सदर प्रशिक्षणामध्ये मतदान प्रक्रियेतील विविध टप्पे, मतदान केंद्राची रचना, मतदार यादी हाताळणी, मतदान साहित्य वितरण व संकलन, ईव्हीएम वापर, मतदानादरम्यान पाळावयाच्या सूचना, आचारसंहिता तसेच आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.१६ व्या चे मतदान दिनाच्या अनुषंगाने मतदारांसाठी प्रतिज्ञा सर्व अधिकारी व कर्मचारी यांना घेण्यात आली. उपस्थित कर्मचारी यांची आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली. प्रत्यक्ष कामकाजात काटेकोरपणे अंमलात आणाव्यात, असे निर्देश देण्यात आले.



## बनवस सर्कल जि.प.मतदारसंघातून शांतीस्वरूप जाधव यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

**पालम,/प्रतिनिधी-** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या रणधुमाळीत राजकीय हालचालींना वेग आला असून पालम तालुक्यातील बनवस सर्कल जिल्हा परिषद मतदारसंघातून शांतीस्वरूप जाधव यांनी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केला.या वेळी त्यांच्या समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित

या वेळी कार्यक्रत्यानी शक्तिप्रदर्शन करून ढोल-ताशांच्या गजरात,घोषणा देत कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला होता. यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी बोलताना शांतीस्वरूप जाधव यांनी सांगितले की, बनवस सर्कलमधील रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण व मूलभूत सुविधांचा सर्वांगीण विकास हेच आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. जनतेच्या विश्वासावर व विकासाच्या मुद्यावर ही निवडणूक लढवणार असल्याचा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच प्रचार दौऱ्याच्या झंजावतीमध्ये मतदाराचा कोर चांगल्या प्रकारचा आढळून



आला असे हे त्यांनी बोलताना सांगितले यामध्ये आपण मतदाराचे रूम चांगल्या प्रकारे फेडणार असेही त्यांनी सांगितले मतदार राजा हे माझे दैवत असून त्यांचा कुठल्याही संकटामध्ये आणि वेळप्रसंगी मी सहकार्य करण्याची भावना त्यांनी व्यक्त केली मतदार संघामध्ये मतदारांशी चर्चा केली असता त्यांनी आमचे अमूल्य मत शांतीस्वरूप यांच्याकडेच कोण देत आहोत असेही सांगितले.

## पालकमंत्री मेघना बोर्डीकरांच्या उपस्थितीत असंख्य महिला व पुरुषानी घेतला प्रवेश

# अखेर आशाताई खिल्लारे भाजपत; भाजपात इन्कमिंग सुरूच

**जिंतूर,/प्रतिनिधी:** माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपमध्ये सध्या अन्य पक्षांच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा प्रवेश होत असून यापूर्वीच मजबूत असलेली जिंतूर सेलू मधील भाजप पुन्हा ऐन निवडणुकीच्या काळात भाजप मजबूत स्थितीत दिसत आहे.

नुकतीच नगरपालिका निवडणूक संपन्न झाली असून या निवडणुकीत भाजपने जिंतूर सेलूत पालिका निवडणुकीत आपली पकड मजबूत असल्याचे स्पष्ट केले असून आता सध्या मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे.

या निवडणुकी दरम्यान भाजपात प्रवेशाची जोरदार रणधुमाळी दिसून येत आहे.प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या माजी आमदार विजय भांबळे यांचे असंख्य कट्टर समर्थकांनी भाजपात प्रवेश घेतल्याने विरोधकांनी चांगला धक्का घेतल्याचे दिसून आले यापूर्वी नाना राऊत, राजेंद्र नागरे, अविनाश काळे या सारख्या मातब्बरांनी भाजपमध्ये प्रवेश घेतलेलाच आहे.

आता या पूर्वी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका अध्यक्षा मनिषा केंद्रे यांनी भाजपत प्रवेश घेऊन राष्ट्रवादी पक्षास धक्का दिला.कारण केंद्रे यांनी बहुतांश काळ राष्ट्रवादीत पक्ष वाढी साठी मोलाचे कार्य करण्यास



नेहमी पुढाकार घेत आपला ठसा त्यांनी उमटविला होता.

हा प्रवेश होत नाही तोच आज रमाई विचार महिला मंचच्या अध्यक्षा व शिव प्रतिष्ठानच्या प्रमुख आशाताई संभाजी खिल्लारे यांनीही असख्य महिला व पुरुषांना सोबत घेत पालकमंत्री मेघना बोर्डीकरांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश घेतला.

मनिषा ताई केंद्रे तसेच आशाताई खिल्लारे यांच्या भाजप प्रवेशाने भविष्यात भाजपात जिंतूर- सेलु तालुक्यात असख्य मोठ्या प्रमाणात महिलांची मजबुत मोठ भाजपाशी बांधली जाणार आहे. कारण मनिषा केंद्रे तसेच आशाताई संभाजी खिल्लारे यांची ओळख सामाजिक कार्यात नेहमी पुढाकार घेत असलेले नेतृत्व म्हणून परिचित आहेत.

आज घेतलेल्या आशाताई संभाजी खिल्लारे यांनी घेतलेल्या प्रवेशा दरम्यान दाभा,दिग्रस, गडगव्हाण, इटोली आदी गावांच्या असख्य महिला सह मोठ्या संख्येने पुरुषांचाही समावेश होता.

या प्रवेशा दरम्यान पालकमंत्री मेघना बोर्डीकरांच्या प्रमुख उपस्थिती सह डॉ. कऱ्हाळे मनिषा केंद्रे,आशाताई खिललारे,नानासाहेब राऊत,अविनाश काळे,आदींची उपस्थिती होती.

प्रवेशा दरम्यान आशाताई खिल्लारे यांनी तालुक्यातील मागासवर्गीयांचे असख्य प्रश्नांची सोडवणूक पालकमंत्री मेघना बोर्डीकरानी सोडवून समाजास न्याय देण्याचे आलं करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. व याच कारणाने भाजपात प्रवेश घेतल्याचा खुलासा त्यांनी केला.

भाजप पक्ष नेहमीच ''सबका साथ सबका विकास'' या तत्वावरच आपली राजकीय वाटचालीवर करत देशात नंबर एकचा पक्ष म्हणून जगता पुढे आलेला आहे.भाजप नेहमीच विकासाची व विकास कामाची गंगा सामाजिक घटकांच्या शेवटच्या स्तरापर्यंत हक्क देते असे सांगून तालुक्यातील नक्कीच पूर्ण मागासवर्गीयांचे पूर्ण प्रश्न सोडविले जातील असे प्रवेशा दरम्यान आश्वासित केले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

१.**गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# डोळे उघडणारा आणि पथप्रदर्शकही!

अस्थिर आणि निराशाजनक जागतिक परिस्थितीतही देशाच्या अर्थव्यवस्थेचा वाढलेला वेग आश्वासक असल्याचे आर्थिक अहवालात नमूद केल्यामुळे देशवासीयांना हायसे वाटणे स्वाभाविक म्हणावे लागेल. नवीन आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा वेग ६.८ ते ७.२ टक्क्यांपर्यंत राहणार असल्याचे तसेच डॉलरच्या तुलनेत रुपयाची सातत्याने घसरण होत असली तरी त्याचा अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होणार नसल्याचा जो विश्वास या आर्थिक अहवालातून व्यक्त करण्यात आला आहे, तो मरगळलेल्या मनाला निश्चितच उभारी देणारा आहे. अर्थव्यवस्थेचा विकास दर ७.४ टक्के राहील, असे अनुमान होते, त्या तुलनेत ७.२ टक्के हा दर आपल्या अपेक्षेपेक्षा फार काही कमी नाही. दरवर्षी देशाचा अर्थसंकल्प सादर करण्याच्या पूर्वसंध्येला संसदेत आर्थिक अहवाल सादर केला जातो. यावेळी असा अहवाल तीन दिवस आधी सादर करण्यात आला आहे. आर्थिक अहवाल आणि अर्थसंकल्प यांचे जवळचे नाते आहे. आर्थिक अहवालातून मागील वर्षाच्या देशाच्या आर्थिक स्थितीचे तटस्थ मूल्यांकन केले जाते, याला एकप्रकारचे आर्थिक अंकेक्षण म्हटले तरी हरकत नाही, तर अर्थसंकल्पातून पुढील वर्षी देशाचे आर्थिक नियोजन कसे असेल, याचा आराखडा देशवासीयांसमोर सादर केला जातो. आर्थिक अहवालात जगातील आर्थिक, सामाजिक तसेच राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला जातो. त्यानुसार यावर्षीही जगात अस्थिरता राहील, पण ती काही प्रमाणात नियंत्रणात राहील, असा अंदाज वर्तवण्यात आला. दुसऱ्या शक्यतेनुसार बहुकेंद्रीय जगाच्या सर्व व्यवस्था कोसळतील असे म्हटले तर तिसऱ्या शक्यतेनुसार व्यवस्थेला बसणारे धक्के वाढत जातील, याकडे अहवालातून लक्ष वेधण्यात आले. देशाच्या अर्थव्यवस्थेची मांडणी करताना आपल्याला संभाव्य जागतिक अस्थिरतेचा आढावा घ्यावा लागणे अपरिहार्य आहे. आकाशात काळे ढग आले तर सामान्य माणूस ज्याप्रमाणे छत्री घेऊन बाहेर पडतो, त्याप्रमाणे अर्थव्यवस्थेची आखणी करताना अनेक शक्यता विचारात घ्याव्या लागतात.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यावर्षी नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करणार आहेत, हा एक विक्रम म्हटला पाहिजे. सीतारामन् या देशातील पहिल्या महिला अर्थमंत्री आहेत. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना त्यांनी अर्थखाते आपल्याकडे ठेवले होते. पण त्या तेव्हा पूर्णवेळ अर्थमंत्री नव्हत्या. अर्थसंकल्प दरवर्षी १ फेब्रुवारीला सादर केला जातो. यात आतापर्यंत कधीही खंड पडला नाही. यावर्षी १ फेब्रुवारीला रविवार म्हणजे सुटी असतानाही अर्थसंकल्प संसदेत सादर केला जाणार आहे. मोदी सरकारने देशातील अनेक जुन्या आणि कालबाह्य परंपरा रद्द केल्या. आधी अर्थसंकल्प हा सायंकाळी ५ वाजता संसदेत सादर केला जात होता. पण मोदी सरकारने सत्तेवर आल्यानंतर ही प्रथा बंद करत अर्थसंकल्प सकाळी ११ वाजता संसदेत सादर करण्याची नवी आणि योग्य परंपरा सुरू केली. यासोबत मोदी सरकारने रेल्वेचा वेगळा अर्थसंकल्प सादर करण्याची परंपराही मोडीत काढली. अर्थमंत्री म्हणून निर्मला सीतारामन् यांनी हा आर्थिक अहवाल संसदेत सादर केला असला तरी मोदी सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन् यांनी तो तयार केला आहे. सामान्य माणसाच्या दृष्टीने अर्थसंकल्प हा डोक्यावरून जात असतो, तीच स्थिती अनेकदा आर्थिक अहवालाचीही असते. अर्थसंकल्पात आयकराची मर्यादा किती वाढते, याकडेच देशातील मध्यमवर्गाचे लक्ष असते. त्यामुळे यावर्षी सीतारामन् यांच्या पोतडीतून देशवासीयांच्या हातात काय पडणार, याबाबत कमालीची उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे. आर्थिक अहवालात जसा देशाच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेतला जातो, तसाच तो कृषी आणि उद्योगासह अन्य क्षेत्रांबाबतचाही आढावा घेतला जातो. देशाची अर्थव्यवस्था सुदृढ असल्याबद्दल समाधान व्यक्त करताना या अर्थव्यवस्थेचा फायदा ज्यांना खरोखर आवश्यकता आहे, अशा समाजातील त्या वर्गापर्यंत पोहोचतो की नाही, याचेही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. महागाई कमी झाल्याचा दावा या आर्थिक अहवालातून केला जात असताना बाजारात गेल्यानंतर मध्यमवर्गाला येणारा अनुभव वेगळाच असतो, याचीही दखल घेतली पाहिजे. रोजगार निर्माण झाले असताना, असा दावा सरकारी पातळीवर केला जात असताना, देशातील बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस का वाढत आहे, याचाही विचार झाला पाहिजे. मुळात सरकारवर टीका करण्यासाठी याचा उपयोग करण्यापेक्षा सरकारला मार्ग दाखविण्यासाठी याचा उपयोग केला गेला पाहिजे.

एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी अंत्योदयाची संकल्पना मांडली. अंत्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण. मोदी सरकारची गेल्या अकरा वर्षांतील वाटचाल ही अंत्योदयाच्या धोरणानुसार म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण गृहीत धरून सुरू आहे. मोदी सरकारने आपल्या कार्यकाळात जेवढ्या लोककल्याणाच्या योजना सुरू केल्या, तेवढ्या आजपर्यंत कोणत्याही सरकारने सुरू केल्या नाहीत. निर्मला सीतारामन् यांच्याआधी अरुण जेटली अर्थमंत्री होते. अल्पकाळासाठी पीयूष गोयल यांनी अर्थखाते सांभाळले. पण जेटली असो, गोयल असो की निर्मला सीतारामन् या भाजपाच्या सगळ्या अर्थमंत्र्यांचा अर्थसंकल्प हा अंत्योदयाच्या भूमिकेवरच बेतलेला होता. आर्थिक अहवाल हा बऱ्यापैकी परखड असतो. सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणाची तो चिरफाड करत असतो. पण त्याचा उद्देश सरकारवर टीका करण्याचा नाही तर सरकारच्या आर्थिक धोरणातील त्रुटी लक्षात आणून देणारा असतो. एकप्रकारे आर्थिक अहवालातून सरकारच्या डोळ्यात अंजन घालण्याचा प्रयत्न केला जातो. मुळात आज जग इतके छोटे झाले की एका देशातील अस्थिर राजकीय परिस्थितीचा परिणाम त्याच्या आजूबाजूच्या सर्व देशांवर होत असतो. भारत रशियाकडून कच्चे तेल घेत होता. यामुळे दुखावलेल्या अमेरिकेने भारतीय वस्तूंच्या आयातीवर जे शुल्क लावले, त्याचा फटका आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर निश्चितच पडला आहे. रशिया आणि अमेरिका यांच्या भांडणात मधल्यामध्ये भारत विनाकारण भरडला गेला, त्याच्यावर टॅरिफची कुऱ्हाड कोसळली. पण यातून बाहेर पडण्यासाठी भारताने युरोपियन समुदायासह अन्य काही देशांशी व्यापारी करार केले आहेत. युरोपियन देशांशी करण्यात आलेल्या 'मदर ऑफ ऑल डील्स' या कराराने अमेरिकेच्या टॅरिफमुळे होणारे नुकसान कमी केले. मुळात कोणत्याही अर्थव्यवस्थेसाठी आयात कमी आणि निर्यात जास्त असली पाहिजे, तरच अर्थव्यवस्था सुदृढ असते. महागाई लक्षणीय प्रमाणात कमी होत असताना कल्याणकारी योजना तळागाळातील लोकापर्यंत प्रभावीपर्यंत पोहोचत असल्यामुळे दारिद्र्यात घट झाल्याचे निरीक्षणही यात नोंदवण्यात आले. यावेळच्या आर्थिक अहवालाचे वेगळेपण म्हणजे देशातील कृषी क्षेत्राचा आढावा घेताना आरोग्य क्षेत्राचा अभ्यासपूर्ण आढावाही यातून घेण्यात आला आहे. अतिप्रक्रिया केलेल्या अन्नाच्या अतिसेवनामुळे लठ्ठपणाची समस्या वाढत असल्याकडे तसेच यातून हृदयविकार, श्वसनाचे विकार, मधुमेह आणि मानसिक आरोग्याच्या समस्या उद्भवतात. परिणामी त्याच्यावरील उपचारासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक ताण येतो. याचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो, याकडे लक्ष वेधण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे अतिप्रक्रिया केलेल्या अन्नामुळे मुला-मुलींमधील लठ्ठपणा वाढत असल्यामुळे या पदार्थाच्या जाहिरातींवर निर्बंध लादण्याची सूचनाही या अहवालातून करण्यात आली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आठवीनंतर बहुतांश मुले शाळा सोडतात. ही गळती थांबविण्याची आवश्यकता या आर्थिक अहवालातून व्यक्त करण्यात आली. अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या लोकप्रिय घोषणांचा जो सपाटा राज्य सरकारे लावत आहे, त्याबद्दलही या अहवालातून चिंता व्यक्त करण्यात आली. देशातील विविध राज्यांत अशा योजनांवर १ लाख ७० हजार कोटी रुपये खर्च करावे लागतात. त्यामुळे आवश्यक विकासकामांवरील खर्चात कपात करावी लागत असल्याची चिंताही या अहवालातून व्यक्त करण्यात आली. त्यामुळे यावर्षीचा आर्थिक अहवाल हा खरोखरच सर्व राज्य सरकारांचे डोळे उघडणारा तर केंद्र सरकारसाठी पथप्रदर्शक असा म्हणावा लागेल.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# आपण लोकशाहीच्या योग्यतेचे आहोत?

२६ जानेवारी २०२६ रोजी आपण प्रजासत्ताक दिन साजरा केला. भारत २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक झाला. या दिवशी भारताची राज्यघटना लागू झाली. तेव्हापासून भारताने आपल्या स्वतःच्या घटनात्मक चौकटीनुसार स्वतःचे शासन करण्यास सुरुवात केली. १९३० च्या पूर्ण स्वराज्य घोषणेचा सन्मान करण्यासाठी २६ जानेवारी हा दिनांक प्रजासत्ताकसाठी निवडण्यात आला, कारण तेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटिश राजवटीपासून संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली होती. भारतीय संविधानाची निर्मिती संविधान सभेने केली, ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेला जवळपास तीन वर्षे लागली, ज्यामुळे आपले संविधान हे जगातील सर्वांत तपशीलवार संविधान झाले. म्हणजेच आपण सर्वांगीण आणि सखोल विचार करून संविधानाची निर्मिती केली आहे. आज इतक्या वर्षांनंतर आपण जेव्हा काही गोष्टी पाहतो तेव्हा एक प्रश्न मनात निर्माण होतो की खरोखर आपण लोकशाहीच्या योग्यतेचे आहोत का?

भारताची लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. आपण संघराज्य आहोत. म्हणजे आपल्याकडे राज्य सरकारही आहे आणि केंद्र सरकारही आहे. आपल्याकडे न्यायव्यवस्थेसाठी स्वतंत्र यंत्रणा आहे आणि या सर्वांनी मिळून आपण एक राष्ट्र म्हणून अभिमानाने जगत आहोत. पण प्रजासत्ताक दिनाला ७६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर भारतीय जनता म्हणून आपल्याला आता गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. काही दिवसांपूर्वी अंजली भारती यांनी मुख्यमंत्र्यांच्या पत्नीवर अश्लाघ्य भाष्य केले होते. विशेष म्हणजे त्या कार्यक्रमात जमलेल्या एकाही व्यक्तीला त्यांनी केलेले कृत्य चुकीचे आहे असे म्हणावेसे वाटले नाही. उलट अनेकांनी टाळ्या वाजवल्या. सर्व स्तरांतून टीका झाल्यानंतर अंजली भारती यांनी माफी मागितली. पण त्यात जाणिवेचा अभाव होता. मुंबईच्या मालाड रेल्वे स्टेशनवर ओमकार शिंदे या तरुणाने अगदी क्षुल्लक वादावरून अलोक कुमार सिंह या ३३ वर्षीय प्राध्यापकाचा खून केला. मुंबई लोकल ही तशी संवेदनशील जीवनवाहिनी आहे. कारण इथे रोज वाद, मारामाऱ्या होतच असतात. पण छोट्याशा वादावरून खून केल्याच्या घटना सहसा घडत नाहीत. असे मानसिक रुग्ण जर लोकलमधून प्रवास करणार असतील तर ही जीवनवाहिनी देखील सुरक्षित नाही, असं म्हणण्याची पाळी येईल. माणसातला संयमीपणा लोप पावतोय का? सूरज शिर्के नावाच्या मराठी तरुणाने राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर अत्यंत खालच्या



पातळीवर जाऊन टीका केली होती. त्यामुळे दोन्ही गटांतील कार्यकर्ते चिडले. मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्याचा शोध घेतला आणि त्याला मारहाण केली व त्याची सुमारे दीड किलोमीटर अर्धनग्न धिंड काढली. त्यानंतर सूरजने हात जोडून दोन्ही ठाकरे बंधूंची जाहीर माफी मागितली आहे. सूरजने प्रसिद्धीसाठी दोन्ही ठाकरे बंधूंना शिवीगाळ केली. मुळात अशा प्रकारच्या गलिच्छ टीकेची गरजच नाही. तुम्ही संवैधानिक भाषेत टीका करू शकता. सूरजचं चुकलं, पण... मनसेच्या कार्यकर्त्यांनी कायदा हातात घेतला. अर्थात ती त्यांच्या सवयीची बाब आहे म्हणा. मात्र लोकशाहीत कायदे हातात घ्यायचे झाले, तर स्वतःला नेते म्हणवणारे लोक किती अपराध करत असतात आणि त्यांचे कार्यकर्ते किती दादागिरी करत असतात, अशा परिस्थितीत जनतेने कायदा हातात घ्यायचं ठरवलं तर लोकशाही टिकेल?

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. ज्या दिवशी ही बातमी कळली, तेव्हाच लगेच काही लोक ''हा घातपात आहे... '' अशा पोस्ट्स करू लागले. काही लोकांनी तर अजितदादांवर टीका केली. विशेष म्हणजे यात सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सर आणि जबाबदार पदांवर राहिलेले लोक होते. ज्यावेळी एखादी व्यक्ती हे जग सोडून जाते तेव्हा त्या व्यक्तीच्या कुटुंबाला किती यातना होत असतील. ती व्यक्ती मोठी असल्याने तिचे कार्यकर्तेही दुःखी असतात. अशा वेळी कार्यकर्त्यांचा उद्रेक झाला तर किती मोठा प्रसंग उभा राहू शकतो. एखादी व्यक्ती गेल्यानंतर काही दिवस तरी बटणं बडवू नका. सोशल मीडिया ही चावडी झाली आहे. इथे केवळ सामान्य माणूसच नव्हे तर जबाबदार माणूसही काही बरळतो. आपल्याला जे स्वातंत्र्य मिळालंय, संविधान मिळालंय, त्यामागची भावना आपण कधी समजून घेणार आहोत? कायदे मोडणे. कायदे हातात घेणे, गंभीर परिस्थिती निर्माण होईल असे वर्तन वा वक्तव्य करणे, क्षुल्लक वादावरून मारहाण किंवा खून करणे यासाठी आपण प्रजासत्ताक झालोय का?

या सगळ्या घटना उदाहरणासाठी दिलेल्या आहेत. नागरिक म्हणून आपण किती बेजबाबदार आहोत, याचे अनेक दाखले देता येतील. प्रत्येक वेळी सिस्टिमला दोष देऊन चालत नाही. देशाने माझ्यासाठी काय केलं? हा प्रश्न विचारण्याआधी मी देशासाठी काय केलं? हा प्रश्न विचारण्याची सवय लावून घेतली पाहिजे. आपली लोकशाही मजबूत आहे, आपलं संविधान सशक्त आहे. पण आपल्या देशाची खरी ताकद आपल्या प्रत्येक नागरिकाच्या वर्तणुकीत आहे. संविधानाने आपल्याला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले, पण ते जबाबदारीने वापरणे गरजेचे आहे. मतभेद असतील, टीका असतील, पण ती अभद्र, हिंसक किंवा कायद्याच्या पलीकडे जाऊन करू नये. जेव्हा वादातून लोक खून करू लागतात, जेव्हा सोशल मीडियावर मृत व्यक्तीच्या कुटुंबाला दुखावणाऱ्या पोस्ट्स केल्या जातात, जेव्हा राजकीय मतभेदांमुळे कायदे हातात घेतले जातात, तेव्हा खरा प्रश्न उभा राहतो. आपण खरंच लोकशाहीच्या योग्यतेचे आहोत का? ७७ वर्षांत आपण खूप प्रगती केली. जगातील सर्वांत मोठी लोकशाही, आर्थिक विकास, तंत्रज्ञान, महिला सक्षमीकरण. पण हे सगळे टिकवायचे असेल तर प्रत्येक नागरिकाने स्वतःमध्ये बदल करायला हवा. आज आपल्याला फक्त राजकीय लोकशाहीच नव्हे, तर सामाजिक संयम, सहिष्णुता आणि जबाबदारीने वागण्याची गरज आहे. अन्यथा हे ७७ वर्षांचे यश धोक्यात येईल. आपण सर्वांनी स्वतःला विचारायला हवे की, मी लोकशाहीला मजबूत करतोय की कमकुवत करतोय? कारण लोकशाही ही फक्त सरकारची नाही, ती आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. जर आपण संयम ठेवला, सहानुभूतिपूर्ण वागलो आणि कायद्याचा आदर ठेवला, तरच लोकशाही खऱ्या अर्थाने टिकू शकेल आणि वृद्धिंगत होऊ शकेल. अन्यथा हा प्रश्न कायम राहील - आपण लोकशाहीच्या योग्यतेचे आहोत का?

writerjayeshmestry@gmail.com


## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# 'क्रांतिज्योती' ते स्टॅलिन, फरक आहेच!

आता लवकरच मराठी भाषा दिवस येईल. अनेक लोक मराठीचा उदो उदो करतील. पण, पुन्हा स्थिती 'जैसे थे'च राहील. मराठीचा विषय येतो तेव्हा कायम एक प्रश्न पडतो की, हा आग्रह राज्य म्हणून मराठी भाषेचा आहे की मातृभाषा म्हणून आहे. अगदी शास्त्रीय अभ्यासातून हे सिद्ध झाले आहे की, मातृभाषेतून झालेले प्राथमिक शिक्षण मुलांच्या बुद्धीच्या विकासासाठी अतिशय पोषक ठरते. एकदा मेंदूचा विकास नीट झाला की तुम्ही कोणतीही भाषा तितक्याच सक्षमपणे शिकू शकता. असे असूनही आजदेखील भाषेचा संबंध अस्मिता किंवा अशा शास्त्रीय मुद्द्यांशी न जोडता प्रांतवादाशी किंवा राजकारणाशी का जोडला जातो, हा प्रश्नच आहे.

नुकताच मराठीत एक चांगला चित्रपट आलाय् 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम'. शोकांतिकेची सुरुवात इथून आहे की, मराठी चित्रपट कोणता आलाय, कोणता येणार आहे, हेदेखील आपल्या मराठीजनांना फारसे माहिती नसते. असो. पण, या चित्रपटाने पुन्हा एकदा मराठी शाळांचा विषय ऐरणीवर आणला. महाराष्ट्रात आहात तर मराठी बोला वगैरे वाक्य आपण राजकीय नेत्यांच्या तोंडून ऐकतो. ते त्यांच्या परीने राजकारण करत असतीलही. एक मात्र खरे की महाराष्ट्रात असताना किमान मूळ मराठी लोकांनी तरी मराठीत बोलले पाहिजे. सर्वांत मोठा भ्रम म्हणजे, भाषेचा संबंध आपण आत्मविश्वासाशी आणि पर्यायाने प्रगतीशी जोडतो. लहानपणापासून कॉन्व्हेंटमध्ये शिकणाऱ्या मुलांचा आत्मविश्वास नव्हे 'कॉन्फिडन्स' फारच चांगला असतो आणि त्या तुलनेत मराठी माध्यमात शिकलेली मुले नंतरच्या जीवनात उघडी पडतात. 'क्रांतिज्योती'ने या समजाचाही ऊहापोह केला. प्राथमिक शिक्षण



मराठीत घेतलेले अनेक जण आज विदेशात सक्षमपणे काम करताहेत. त्यांना संवाद प्रक्रियेत कोणतीही अडचण येत नाही. याचाच अर्थ, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून घेतल्याने आत्मविश्वास कमी होतो, ही बाब तितकीशी जोरकस नाही. जे लोक असा दावा करत असतील त्यांनी मराठी नाही तर किमान एकच दक्षिणेतील उदाहरण पाहावे (कारण आपल्याला दुसऱ्याचं उदाहरण जास्त लवकर पटतं) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी मातृभाषेतूनच प्राथमिक शिक्षण घेतले होते आणि ते कायम मातृभाषेतून शिक्षण घेण्याचा पुरस्कार करायचे. ते आग्रहपूर्वक म्हणायचे, मुलांना प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे.

एवढे सगळे असूनही आपण मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणासाठी आजही कचरतो. एवढेच कशाला, जे नेते मराठीच्या मुद्द्यावरून राजकारण करतात त्यांची मुले केंद्रीय बोर्डाच्या मोठमोठाल्या इंग्रजी माध्यम शाळेत शिकतात. हा विरोधाभास कुठेतरी समाजाला बुचकाळ्यात टाकतो. पण, इथे एकच मुद्दा लक्षात ठेवावा की, मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण कधीही नुकसान करत नाही. कारण आजकाल बालक मंदिरापासूनच इंग्रजी भाषा देखील शिकवली जाते. पूर्वी इंग्रजी भाषा पाचव्या वर्गापासून शिकवली जायची. त्यामुळे मराठी माध्यमात शिकल्याने इंग्रजीचा गंधच राहणार नाही, असे म्हणण्याला वावच नाही. त्यातही आता राज्य सरकारने आपली मुले पुढील स्पर्धा परीक्षेत मागे पडू नये म्हणून सीबीएसईच्या धर्तीवर राज्यातील शिक्षण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे स्टेट बोर्डात टाकले तर आपले मूल मागे पडेल, ही धास्ती उरण्याचीही गरज नाही. दुसरा सगळ्यात मोठा मुद्दा खर्चाचा. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये असणारे भरमसाट शुल्क आणि मराठी शाळांचे शुल्क पाहिले तर कितीतरी कमी खर्चात आपला मुलगा दहाव्या वर्गापर्यंत शिकू शकतो. याउलट, इंग्रजी माध्यमात मोठे शुल्क अगदी पहिल्या वर्गापासून सुरू होते आणि दरवर्षी त्यात वाढ होत जाते. म्हणजे आठ ते दहा लाख रुपये खर्च करून काय शिकला तर दहावी पास झाला! मग या बाबतीत लोक भावनिक मुद्दा आणतात की, आम्ही मुलांच्या शिक्षणासाठी खर्चात तडजोड का करायची? तडजोड करूच नका. उलट, उरलेला पैसा त्याला एखादा क्रीडा प्रकार शिकवण्यासाठी किंवा कला आत्मसात करण्यासाठी खर्च करा. त्याने त्याचा व्यक्तिमत्त्व विकास होईल. शेवटी एवढेच म्हणायचे आहे की, दक्षिणेकडील नेता स्टॅलिन जसा आपल्या भाषेचा आग्रह धरतो तसा नाही पण किमान आपली मराठी येणाऱ्या प्रत्येक पिढीत योग्य रीतीने संक्रमित होईल, एवढे तरी तिचे अस्तित्व आपण टिकवले पाहिजे. कारण आपल्याला भाषेचे राजकारण करायचे नाही तर भाषा जगवायची आहे, समृद्ध करायचीय...

७७५५९३८८२२

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# दुःखाच्या राखेतून राजकारण!

अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने राज्याच्या राजकारणासह सर्वसामान्य जनतेलाही मोठा धक्का बसला असताना, या दुःखाच्या क्षणातही काही ठिकाणी राजकीय आरोप-प्रत्यारोपांची ठिणगी पेटताना दिसत आहे. शोक व्यक्त करण्याची, कुटुंबीयांच्या वेदनेत सहभागी होण्याची आणि अजितदादांची त्यांच्या कार्याची आठवण करण्याची वेळ असताना, या दुर्दैवी घटनेभोवती राजकारणाचा रंग चढवण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. एखाद्या नेत्याच्या निधनानंतर समाजाने संवेदनशीलता आणि संयम दाखवणे अपेक्षित असते. मात्र दुःखाच्या राखेतूनही राजकीय स्वार्थाचे गणित मांडले जाणे अत्यंत असंवेदनशीलच म्हणावे लागेल. मग अशा वेळी माणुसकी मोठी की राजकारण, हा मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा समाजासमोर उभा ठाकला जातो.

या दुर्दैवी घटनेचे कव्हरेज करताना प्रसार माध्यमांनी पुड्या सोडून आपला घाणेरडेपणा सिद्ध केला. आता इतकी धक्कादायक आणि मोठी घटना घडलेली असताना, अजितदादांनंतर त्यांच्या पक्षाचं काय? अध्यक्ष कोण होणार?, उपमुख्यमंत्री कोण होणार? मग त्यांच्या पत्नीला करणार, मुलाला समोर आणार, दोन्ही पक्ष एक होऊन पुन्हा शरद पवारांचे नेतृत्व स्वीकारणार असे अनेक पद्धतीने अकलेचे तारे तोडताना माध्यमे दिसली. परिवार आणि चाहते जेव्हा आपल्या लाडक्या नेत्याला पाणावलेल्या डोळ्यांनी अखेरचा निरोप देत होते तेव्हा हा सगळा किळसवाणा प्रकार चालला होता. खरं तर या दुःखातून सावरल्यानंतर पक्षस्तरावर काय तो निर्णय घेतला जाईलच. मोठे दिग्गज अनुभवी राजकारणी दादांच्या पक्षात आहेत, त्यांना कळतं काय करायचं आणि नाही ते. माध्यमांना कसली घाई येऊन पडली एवढी. कुठलीही अनपेक्षित घटना घडलेली असताना लगेच सगळं काही होत नसतं. अशा मोठ्या धक्क्यातून सावरायला जरा वेळ लागतो.

आता माध्यमच कशाला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि उबाठा नेते खासदार संजय राऊतसारखे विवेकशून्य राजकारणी तर यातही राजकारण करू पाहत होते. कट कारस्थान, षडयंत्राच्या चर्चा करताना ते दिसले. खरे तर शरद पवारांनी स्वतः समोर येऊन सांगितले की, या अपघाताचे कोणी राजकारण करू नका म्हणून. तरीदेखील या दुर्दैवी आणि धक्कादायक अपघाताचे राजकारण करायला हे लोक विसरले नाहीत. यालाच मृताच्या टाळूवरचं लोणी खाणं असं म्हणत असावं कदाचित.

अपघात कुठलाही होवो, त्याचा तपास हा यंत्रणा करतच असतात. तो सुरूदेखील झाला आहे. राज्याची पोलिस यंत्रणा आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) तपास करत आहेत. मुळात इतकी धक्कादायक घटना घडल्यानंतर या प्राथमिक गोष्टी तर शासन, प्रशासन आणि तपास यंत्रणा तातडीणे करतातच. अर्थात त्या कराव्याच लागतात. त्यात नवं असं काही नाही. अपघाताच्या चौकशीला वेळ लागतो, तांत्रिक बाबींची पडताळणी होते, अधिकृत अहवाल येतो. ही एक सुसूत्र प्रक्रिया असते. मात्र, त्या प्रक्रियेला धक्का देत 'कोण जबाबदार?', 'कट होता का?' अशा प्रश्नांची उचल पटकन केली जाते, तेव्हा ते शोकाकुल वातावरणात अधिक गोंधळ निर्माण करणारं ठरतं. आणि मुळात सर्व यंत्रणा सरकारच्या दावणीला बांधल्या असल्याचा आरोप हेच लोक करतात. मग पुन्हा त्याच यंत्रणांकडून तपास करण्याचा आग्रह धरतात. हा दुटप्पीपणा लक्षात येण्याजोगा आहे. दोन्ही तबल्यावर हात मारण्याचा हा प्रकार आहे. यांना अजितदादांच्या अपघाती मृत्यूचं काहीही एक देणंघेणं नसून, केवळ त्याचंही राजकीय भांडवल करायचं आहे. नव्हे यातून स्वतःचा राजकीय स्वार्थ साधायचा आहे. आणि यांचा हा घाणेरडा हेतू या कृतीतून उघडा पडला, हे मात्र निश्चित.

अजित पवारांसारख्या नेत्याने राज्याच्या राजकारणात अनेक दशकं घालवली. त्यांच्या कार्यपद्धतीवर मतभेद असू शकतात. राजकीय भूमिका वेगवेगळ्या असू शकतात, पण त्यांच्या अचानक जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघू शकत नाही. अशा वेळी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होणे हे अधिक आवश्यक ठरते. अकस्मात घडलेली एखादी दुर्घटना केवळ जीवितहानी घडवत नाही, तर ती समाजाच्या संवेदनशीलतेची, माध्यमांच्या जबाबदारीची आणि राजकारण्यांच्या परिपक्वतेचीही कसोटी पाहते. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मोठं नाव असलेल्या अजित पवारांच्या अकाली अपघाती निधनाने राज्यभर शोककळा पसरली आहे. एखाद्या नेत्याचा मृत्यू हा केवळ एका पक्षाचा किंवा विचारसरणीचा विषय नसतो. तो त्या व्यक्तीच्या कुटुंबाचा, सहकाऱ्यांचा आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या लाखो लोकांच्या भावनांचा विषय असतो. अशा वेळी राजकीय नेत्यांनी, समाजाने आणि विशेषतः माध्यमांनी संयम बाळगणे अपेक्षित असते. परंतु, या अपघातानंतर काही ठिकाणी दिसलेली घाई, अर्धवट माहितीवर आधारित चर्चा आणि संवेदनशीलतेचा अभाव अस्वस्थ करणारा ठरला.

सार्वजनिक जीवनातील प्रभावी व्यक्तींनी अशा प्रसंगी अधिक संयमाने बोलणे अपेक्षित असते. कारण त्यांचे शब्द केवळ त्यांचे मत नसते, तर ते समाजात प्रतिध्वनी निर्माण करतात. दुर्घटनेच्या क्षणी संशयाची बीजे पेरणे किंवा राजकीय भूमिका अधोरेखित करण्याचा प्रयत्न करणे, हे दुःख अधिक खोल करणारे ठरते आणि नुकतीच घटना घडलेली असताना किंवा एखाद्या घटनेचा तपास सुरू असताना, त्याला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न झाल्यास, गैरसमजातून उद्रेक होण्याची शक्यता असते. त्यातून सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी किमान संवेदनशीलता दाखवत राजकीय व्यक्ती तसेच माध्यमांनी काही आचारसंहिता पाळली पाहिजे.

दुर्दैवाने, आजच्या डिजिटल युगात बातम्या वेगाने पसरतात, पण त्यासोबतच अपूर्ण माहिती आणि अफवाही तितक्याच वेगाने पसरतात. सोशल मीडियावरील चर्चा, व्हिडीओ क्लिप्स, अप्रमाणित दावे या सगळ्यांमुळे वास्तव आणि अफवा यांच्यातील रेषा धूसर होते. अशा वेळी जबाबदार नागरिक म्हणून आपण सर्वांनी संयम बाळगणे आवश्यक आहे. प्रत्येक गोष्ट तात्काळ समजून घेण्याची घाई आपल्याला चुकीच्या निष्कर्षांकडे घेऊन जाऊ शकते.

राजकारण हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे, पण प्रत्येक प्रसंग राजकारणासाठी नसतो. काही क्षण असे असतात, जेथे माणुसकी राजकारणापेक्षा मोठी असते. एखाद्या नेत्याच्या मृत्यूभोवती निर्माण होणाऱ्या भावना या पक्षीय सीमांपलीकडे जातात. त्या वेदनेला शब्द देताना, आरोपांच्या ज्वाळा पेटवणे योग्य नाही. या दुर्घटनेने आपल्याला एक धडा दिला आहे. संवेदनशीलता ही केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतून दिसली पाहिजे. माध्यमांनी संयम बाळगावा, राजकारण्यांनी परिपक्वता दाखवावी आणि समाजाने अफवांपासून दूर राहावे. तपास यंत्रणांना त्यांचे काम करू द्यावे, कारण सत्य उशिरा का होईना, समोर येतेच. अजित पवारांच्या अकाली निधनाने राज्याला मोठा धक्का बसला आहे. या धक्क्यातून सावरण्यास वेळ लागेल. अशा वेळी दुःखाच्या राखेतून राजकारण करण्यापेक्षा, दुःखात सहभागी होणे, अधिक योग्य ठरेल. कारण शेवटी, राजकारण हे क्षणभंगुर असते, पण माणुसकी कायम राहते.

९२७०३३३८८६

### चांगल्या कर्माची शुभ प्राप्ती

''करम किए जा, फल की इच्छा मत कर, ए इन्सान, जैसा करम करेगा वैसा फल देगा भगवान'' हे सर्व धर्म शास्त्रात नमूद आहे. चांगले कर्म करणाऱ्याला चांगलेच फळ मिळते, त्यांच्या जीवनात व परिवारात सदैव सुख, शांती, समाधान व समृद्धी नांदत असते. सत्कर्म करणाऱ्या व्यक्तीविषयी जगातील कोणीही वाईट चिंतिले किंवा कोणीही त्याच्या वाईटसाठी विघातक व अघोरी मार्ग अवलंबून त्या सत्कर्मीचे आयुष्य विस्कळीत करून बिघडविण्याचा प्रयत्न केला तरी सत्कर्म करणाऱ्या व्यक्तीचे आयुष्य बिघडत नाही.

उलट जे कोणी विघातक व अघोरी मार्ग स्वीकारून सत्कर्म करणाऱ्यांच्या मार्गात अडथळे आणतो त्यांचेच जीवन उद्ध्वस्त होते. सत्कर्म किंवा सर्वांचे शुभ चिंतन करणारी व्यक्ती आपल्या शुभ व सकारात्मक कार्य व विचाराने अधिक सुखी, समाधानी व आनंदी जीवन जगत असते. अशा व्यक्तीसमोर सदैव सर्वांचे शुभ चिंतन असते. शुभ चिंतन मनांना सुख, शांती, प्रसन्नता, आनंद, समाधान प्रदान करते. मात्र अशुभ चिंतणारा किंवा वाईट चिंतन करणारा स्वतः तर दुःखी असतो परंतु आपल्या परिवारालाही दुःखाच्या खाईत ढकलत असतो. म्हणून असे म्हटले जाते की, व्यक्तीचे कर्म व कर्तव्य चांगले, शुभ, निकोप, निर्मळ असल्यास समाजातील कोणीही अशा व्यक्तीचे आयुष्य किंवा जीवन बिघडवू शकत नाही. चांगल्या कर्माचे फळ चांगलेच मिळते तर वाईट कर्माचे फळ वाईटच मिळते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### वाट बघण्यात आयुष्य कशाला संपवायचे?

जीवनातील प्रत्येक गोष्टीसाठी परिस्थितीला जबाबदार न धरता आपली मनःस्थिती बदलली तरच मार्ग सापडतो हेच भगवान श्रीकृष्ण गीतेतून आवर्जून सांगतात. एखादी गोष्ट मनासारखी घडली नाही की माझा योगच नाही असे म्हणून पळवाटा शोधण्यापेक्षा त्यासाठी प्रयत्नशील असावे म्हणजेच आपले कर्म करीत राहिले तर योग्य आपोआप घडून येते. साधे उदाहरण घेतले तर जंगलात पायवाट नसतेच पण आपण सातत्याने तिथून चालत गेलो तर आपोआप वाट तयार होतेच. कोणत्याही बाबतीत प्रतीक्षेत आयुष्य संपविण्यापेक्षा सत्कर्माचे आचरण केले तर परमेश्वराने दिलेले सुंदर आयुष्य नक्कीच सत्कारणी व यशस्वी ठरते. सध्याच्या घडीला यासाठीच भगवद्गीतेचा अभ्यास करून नवीन पिढीने आपले जीवन समृद्ध करावे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

### मरावे परी कीर्ती रूपे उरावे

राजकारण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. मात्र आजच्या काळात राजकीय जीवनाकडे पाहताना सत्ता, स्वार्थ हे शब्द अधिक ठळकपणे समोर येतात. अशा परिस्थितीत मरावे परी कीर्ती रूपे उरावे ही उक्ती राजकीय क्षेत्राला आरसा दाखवणारी ठरते. राजकारणी व्यक्तीचे आयुष्य केवळ निवडणुका जिंकण्यापुरते मर्यादित नसते; त्याच्या निर्णयांचा, धोरणांचा आणि वर्तनाचा थेट परिणाम सामान्य जनतेच्या जीवनावर होत असतो. म्हणूनच राजकीय जीवनातील कीर्ती ही जाहिरातीतून नव्हे, तर लोकांच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासातून उभी राहते. इतिहास साक्षी आहे की सत्तेत असूनही अनेक नेते विस्मरणात गेले, तर सत्तेशिवायही काही नेते अजरामर झाले. कारण त्यांनी राजकारणाला सेवा मानले, साधन नव्हे. त्यांचे देह गेले, पण त्यांचे विचार, त्यांची तत्त्वनिष्ठा आणि लोकांसाठी दिलेले योगदान आजही जिवंत आहे. आज मात्र राजकीय जीवनात उलट चित्र दिसते. क्षणिक लोकप्रियतेसाठी घोषणाबाजी, विरोधकांची बदनामी, जातिधर्माचे राजकारण आणि सत्तेसाठी मूल्यांची तडजोड केली जाते. अशा राजकारणातून मिळणारी प्रसिद्धी ही कीर्ती नसून ती तात्पुरती चमक असते जी काळाच्या ओघात मावळते. खरी राजकीय कीर्ती ही निवडणूक निकालात नव्हे, तर लोकांच्या दुःखात उभे राहण्यात, न्यायासाठी घेतलेल्या धाडसी भूमिकेत, सत्तेत असूनही साधेपणा जपण्यात आणि सत्तेबाहेर असतानाही संघर्ष सुरू ठेवण्यात असते. जनतेच्या प्रश्नांसाठी झटणारा नेता, प्रलोभनांना नकार देणारा प्रतिनिधी, आणि चुकीच्या निर्णयांबद्दल जबाबदारी स्वीकारणारा राजकारणी असे व्यक्तिमत्त्व मृत्यूनंतरही सन्मानाने आठवले जाते. कारण त्यांनी स्वतःचे आयुष्य मोठे करण्यापेक्षा लोकांचे आयुष्य सुलभ करण्याला प्राधान्य दिलेले असते. म्हणूनच राजकीय जीवनात प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाने एकच प्रश्न स्वतःला विचारायला हवा की, मी सत्तेसाठी जगतो आहे, की समाजासाठी? कारण सत्ता क्षणभंगुर असते; पण जनतेच्या मनात निर्माण झालेली कीर्ती काळाच्या पलीकडे जाते. आणि तेव्हाच राजकारणाला खरा अर्थ प्राप्त होतो. नेता देहाने जातो, पण त्याचे कार्य आणि मूल्ये जिवंत राहतात. 'मरावे परी कीर्ती रूपे उरावे' ही केवळ उक्ती नसून, राजकीय जीवनासाठीची खरी कसोटी आहे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# तालखेड फाटा-माजलगाव येथे झालेल्या ६० लाखांचा दरोडा स्थानिक गुन्हे शाखेकडून उघड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जानेवारी**

दिनांक २५/०१/२०२६ रोजी माजलगाव येथील सोनार दुकानदार अमोल पंढरीनाथ गायके वय ३१ वर्षे, रा. भाट वडगाव ता. माजलगाव हे त्यांचे माजलगाव येथील अमोल सोन्याचे दुकानातून आठवडी बाजारात खेर्डा येथे सोन्या चांदीचे दागिने विक्री करण्यासाठी त्यांचे हिरो होंडा पॅशन मोटार सायकलवर पुतण्यसाह जात असताना पाठीमागून स्प्लेंडर मोटार सायकलवर येऊन त्यांना बाजूला थांबण्यास भाग पाडले. गायके यांनी गाडी थांबविल्यावर त्यांना स्प्लेंडर तीन इसमांनी सत्तूरचा धाक दाखवून त्यांचेकडील सोन्या-चांदी दागिन्याची पिशवी बळजबरीने काढून घेऊन पळून गेले. त्यावरून पोलीस स्टेशन माजलगाव ग्रामीण गु.र.नं. ३०/२०२६ कलम ३०९ (४), १२६ (२), ३ (५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल झाला.

वरील प्रमाणे गुन्हा घडल्यापासून मा. पोलीस अधीक्षक, बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांना आदेशीत केले की, सदरचा गुन्हा उघडकीस आणून गुन्ह्यातील गेला माल सोन्या चांदीचे दागिने हस्तगत करावे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तीन वेगवेगळे पथक तयार करून गुन्ह्याचा समांतर तपास सुरु केला. तपासात तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर असे निष्पन्न झाले की, यातील फिर्यादी गायके यांचा दोन मोटार सायकल ज्यामध्ये हिरो होंडा स्प्लेंडर व बजाज पल्सर ने माजलगाव शहरातून रेकी करून पाठलाग केला असून त्यांनी आपससात मोटार सायकलवर बसलेल्यांची अदला बदली करून पोलीसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. परंतु स्थानिक गुन्हे शाखेने यामध्ये बारकाईने तपास करून यातील आरोपीं निष्पन्न केले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, यातील आरोपी हे सध्या बीड येथील शांताई हॉटेलच्या पाठीमागील गल्लीत आहेत. त्यावरून पथकांनी सदर ठिकाणी जाऊन १) एकनाथ ऊर्फ नारायण अरुण कपाले वय ३५ वर्षे, रा. पाटोदा ता. परतूर जि. जालना ह.मु. पांडुरंग रेसीडेन्सी समोर, कॅनाल रोड, बीड २) कृष्णा तुकाराम निरडे वय २२ वर्षे, रा. पावर हाऊस रोड, माजलगाव जि. बीड ३) अभिषेक अशोक शिंदे वय २२ वर्षे रा. पावर हाऊस रोड, माजलगाव जि. बीड यांना ताब्यात घेतले.

सदर आरोपींतांनी गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यांना अधिक विचारपूस करता एकनाथ कपाले यांनी सांगितले की, तो सोनार कारागिर असून त्याने पूर्वी माजलगाव येथे वेगवेगळे ठिकाणी कारागिरीचे काम केले होते व त्याला माजलगाव येथील सोनार दुकानदार यांच्या आठवडी बाजारात जाण्याचे वार व वेळ माहिती होती. तसेच तो सध्या खूप कर्जबाजारी झालेला होता. त्यामुळे नारायण याने माजलगाव येथील सोनार दुकानदार यास आठवडी बाजारास जाताना लुटण्याचे ठरविले. त्यानुसार एकनाथ कपाले याने रेकॉर्डवरील गुन्हेगार कृष्णा निरडे व अभिषेक शिंदे यांना त्याचा प्लॅन सांगितला. त्यानुसार त्यांनी त्यांचे इतर दोन साथीदार मित्र नामे ४) संजीव ऊर्फ संजय विष्णूदास कांबळे वय २८ वर्षे, रा. उमरगा मन्ना ता. उदगीर जि.लातूर ह.मु.पुणे ५) विशाल सूर्यकांत सुळ रा. माजलगाव ह.मु. पुणे यांना सदर कटात सामील केले. सदर आरोपींचे प्लॅन नुसार दिनांक ३१/०१/२०२६ रोजी हिरो होंडा स्प्लेंडरवर एकनाथ कपाले व संजीव ऊर्फ संजय विष्णूदास कांबळे यांनी फिर्यादी यांचे रेकी करून ते आठवडी बाजारास निघाल्यानंतर त्यांचा सदर पाच आरोपीतांनी हिरो होंडा स्प्लेंडर व बजाज पल्सर वर पाठलाग करून शस्त्राचा धाक दाखवून गुन्हा केला आहे.

सदर आरोपीतांचे ताब्यातून १८ तोळे सोन्याचे दागिने व १ किलो चांदी असा एकूण ३०,००,०००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच संजीव ऊर्फ संजय विष्णूदास कांबळे वय २८ वर्षे, रा. उमरगा मन्ना ता. उदगीर जि.लातूर यास देखील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्या घेतले असून एकूण चार आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एक फरार आरोपीचा शोध सुरु आहे. सदर गुन्ह्याचा पुढील सपोनि गोविंद पांडव माजलगाव ग्रामीण हे करीत आहेत.

सदरील कामगिरी ही श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक सुशांत सुतळे, महेश विघ्ने, पोलीस हवालदार जफर पठाण, महेश जोगदंड, मारुती कांबळे, भागवत शेलार, राहूल शिंदे, दिलीप गित्ते, पोलीस अंमलदार बप्पासाहेब घोडके, मनोज परझने, अश्पाक सय्यद, अर्जुन यादव, चालक पोह गणेश मराडे, नितीन वडमारे, अतुल हराळे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड व ढ-उ सेलचे पोलीस उप निरीक्षक शेखर औटे व विकी सुरवसे यांनी केली आहे.



# दास नवमीनिमित्त राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामींचे रथयात्रा पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जानेवारी**

दास नवमीनिमित्त राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामींचे रथयात्रा पालखी सोहळा खंडेश्वरी मंदीराजवळ प्रल्हाद हनुमान मंदीर परिसरात दि.३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी मुक्कामी राहणार असून दि,४ रोजी एकनाथ महाराज यांच्याकडे चहा, नाष्टा त्यानंतर गजानन सांस्कृतीक मंडळ, सहयोगनगर, बीड येथे महाप्रसाद होईल. नंतर पंचायत समिती निवासस्थानी (ज्ञानेश्वर कुलकर्णी) आगमन नंतर, नगर रोड बीड येथील भास्कर जोशी यांच्या गजानन मंदीरात पुजा, नाष्टा, पाणी व नंतर सज्जनगड येथे प्रस्थान होणार आहे, याचा सर्व भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी केले आहे.

दास नवमीनिमित्त राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामींचे रथयात्रा पालखी सोहळा दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी समर्थांची जन्मभूमी जांब समर्थ घनसांगवी जि.जालना ते सज्जनगड जि.सातारा दरवर्षी जात असते, जांब समर्थ व पंचक्रोशीतील समर्थ भक्त मोठ्या प्रमाणावर या सोहळ्यात सहभागी होतात. दरवर्षी बीड शहरातील खंडेश्वरी परिसरातील प्रल्हाद हनुमान मंदीरात पालखीचा मुक्काम असतो, त्याठिकाणी समर्थांची उपासना, हरिपाठ, पंचपदी व महाप्रसाद असतो. दुसऱ्या दिवशी प्रल्हाद हनुमान मंदीरातून रथयात्रा निघून विठ्ठल मंदीर एकनाथ महाराज येथे नाष्टा, चहापाणी होवून दुपारी गजानन मंदीर येथे गजानन सांस्कृतीक मंडळाच्या वतीने महाप्रसाद होऊन पालखी निघते. ज्ञानेश्वर कुलकर्णी पंचायत समिती निवासस्थान येथे समर्थांची पुजा व चहापाणी होऊन रथयात्रेसोबत आलेल्या समर्थ भक्तांचा सत्कार व चहापाणी होऊन पालखी नगर रोडकडे प्रस्थान करते. तेथील ह.भ.प.भास्कर महाराज जोशी यांचे गजानन मंदीरात समर्थांची महापुजा, नाष्टा, चहापाणी होऊन रथयात्रा पालखी सोहळा सज्जनगड कडे मार्गस्थ होईल.

# साधू-संत हे मानवी जीवनाच्या कल्याणासाठी काम करतात - ह.भ.प. प्रकाश महाजन साठे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३१ जानेवारी**

स्पर्धेच्या अन् धावपळीच्या युगात आपण आपला आनंद हरवत चाललो आहोत. प्रत्येकाला आपल्या धर्माकडे, ध्यानाकडे, तसेच योगाकडे वळावे लागेल कारण हि काळाची गरज आहे. तसेच साधू- संतांच्या कृपेशिवाय जीवनात प्राप्ती नाही म्हणून संताच्या सानिध्यात राहून प्रत्येकाने भक्तिभावाने देवाचे नामस्मरण करावे. मानवी जीवनात साधू- संताच्या सानिध्यातच खरा आनंद मिळतो म्हणून साधु संताच्या संगतीत रहावे. असे प्रतिपादन श्रीमत भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प. प्रकाश महाजन साठे यांनी व्यक्त केले.

गेवराई येथे संस्कृती प्रतिष्ठान च्या वतीने गजानन महाराज मंदिर येथे सुरु असलेल्या १९ व्या सत्संग कीर्तन महोत्सवाची हजारो भाविकांच्या उपस्थितीत ह.भ.प. प्रकाश महाजन साठे यांच्या श्रीमत भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. भागवत कथेच्या दुसऱ्या दिवशी ते बोलत होते. त्यांनी भागवत कथा ही नारद रूषी पासून ती परिक्षीय राजा यांच्यापर्यंत कशी पोहचली या विषयी दृष्टांत देऊन उपस्थितांना संसार रूपी मार्गदर्शन केले.

पुढे बोलताना प्रकाश महाजन साठे म्हणाले की, कली हा चार गोष्टीत बसला असून मद्य, हिंसा, व्यभिचार, जुगार यामुळे माणसांनी या




चार गोष्टी पासून दुर राहावे. मित्र संगती चांगली ठेवावी तसेच कली हा सोन्या मध्ये ही बसला असून सोने हे स्व कष्टाचे असावे लुबाडणूक असलेल्यां सोन्यात कलीचा वास असतो. पुरुषांनी घरातील आपल्या पत्नीवर प्रेम करावे तिला घरातील कामात सहकार्य करावे म्हणजे आपला संसार हा आनंदी होईल. तसेच पत्नीने ही आपल्या पती देवाचे ऐकावे म्हणजे घरात कलह होणार नाहीत असे त्यांनी उपस्थितांना आपल्या भागवत कथेतून उपदेश दिले.


धावपळीच्या काळात काही गोष्टी मनावर न घेता सोडून दयायला शिका, टेन्शनमुक्त रहा. असे ही त्यांनी सांगितले. यावेळी महिलांसह पुरुष भाविकांची भागवत कथा श्रवणासाठी मोठ्या संख्येने गर्दी होती. ५ फेब्रुवारी रोजी या सत्संग कीर्तन सोहळ्याची सांगता होणार असून या सत्संग कीर्तन सोहळ्याचा भाविकांनी आस्वाद घ्यावा असे आवाहन सप्ताहाचे अध्यक्ष उद्धव बापू मडके पाटील, समन्वयक माधव चाटे, स्वागताध्यक्ष विनोद सौंदरमल, विष्णुपंत घोंगडे, उपाध्यक्ष विनायक खंडागळे, सचिव बापुराव घुले, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर व्हरकटे मार्गदर्शक मधुकर तौर श्रीहरी पवार सदस्य उत्तमराव सोलाने, दत्ताभाऊ दाभाडे, मनोज हजारे, राधेशाम नामदेव निकम, किरण मिसाळ, गणेश शिवाजी ढाकणे, संदिप मडके, हरिभाऊ गीते, अमोल होड, कचरू काकडे, संतोष आंधळे श्रीनिवास ढाकणे शरद खरातअमोल हिंडे रामजी धोंडरे संतोष सुतार रवी पवार आदीनि केले आहे.

# सादोळ्यातील आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांना हप्ता वाटप करा

## अन्यथा उपोषण करणार - गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ जानेवारी**

तालुक्यातील सादोळा ग्रामपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थी यांना उर्वरीत हप्ता तात्काळ द्यावा अन्यथा दि. १० फेब्रुवारी रोजी उपोषण करण्याचा इशारा ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय सोळंके यांनी गटविकास अधिकारी यांना निवेदनाव्दारे दि. ३० जानेवारी २०२६ रोजी दिला आहे.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील सादोळा ग्रामपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामिण अनेक लाभार्थी पात्र ठरलेले आहेत. त्यापैकी काहींना अद्याप पहिला हप्ता व काहींना दुसरा देखिल हप्ता मिळालेला नाही. संबंधित लाभार्थ्यांनी घरकुलाचे काम नियमानुसार पुर्ण/प्रगतीत असतांना निधी वितरण करण्यात आलेला नाही. याबाबत संबंधित इंजिनिअर माउली जायभाये/तांत्रीक अधिकारी यांच्या वारंवार सांगुन जाणिवपुर्वक दुर्लक्षामुळे व त्यांच्या हलगर्जीपणामुळे लाभार्थ्यांना उर्वरित हप्त्यापासुन वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे गरीब व गरजु लाभार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे पात्र लाभार्थी यांना उर्वरीत हप्ता तात्काळ द्यावा अन्यथा दि. १० फेब्रुवारी रोजी उपोषण करण्याचा इशारा गटविकास अधिकारी यांना देण्यात आला असुन निवेदनावर ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय सोळंके, तंटामुक्ती अध्यक्ष विश्वंभर सोळंके यांच्या स्वाक्ष-या आहेत.

# परळीत लॉजमधे चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर छापा

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष(AHTU) व पोलीस ठाणे परळी ग्रामीण ची संयुक्त कारवाई, दोन पिडीत महिलांची सुटका

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३१ जानेवारी**

अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव व परळी ग्रामीणचे सहायक पोलीस निरीक्षक सदानंद मेंडके यांना दिनांक २९/०१/२०२६ रोजी दुपारी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, पोलीस ठाणे परळी ग्रामीण हद्दीत साई लॉज टोकवाडी, परळी बीड रोड येथे बाहेर जिल्ह्यातून महिलांना बोलावून, वेश्या व्यवसाय करीत आहेत. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी पोलीस निरीक्षक मझहरअली सय्यद प्रभारी पोलीस ठाणे परळी ग्रामीण यांना AHTU टीम सोबत सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून पोस्टे परळी ग्रामीण PI मझहरअली सय्यद, API सदानंद मेंडके स्टाफसह व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख PSI पल्लवी जाधव या त्यांच्या संपूर्ण स्टाफसह तसेच डमी ग्राहक व दोन शासकीय पंचासह सापळापूर्व पंचनामा करून सदर ठिकाणी गेले. डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी १५०० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास ठरलेला इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या पुरुषाला त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव नाशर नशीर शेख असे सांगितले. सदर पुरुषाची पंचासमक्ष झडती घेतली असता, डमी ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या ३ नोटा मिळून आल्याने त्या पंचासमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी दोन पीडित महिला मिळून आल्या . त्यापैकी डमी ग्राहकासोबत रूम मधे मिळून आलेल्या पीडीत महिलेला विश्वासात घेवून चौकशी केली असता , तीने सांगितले की, ती भिवंडी ठाणे ची असून दत्ता अंतराम मुंडे याने मला फोन करून इथे बोलवून घेतले आहे. तसेच दुसरी महिला पुणे येथून आली आहे. प्रत्येक ग्राहकाकडून १५०० रू घेतात व त्यापैकी आम्हाला ५०० रु देतात.

एजंट नाशर नशीर शेख व मॅनेजर सोमनाथ ज्ञानोबा मुंडे रा. टोकवाडी तसेच दत्ता अन्तराम मुंडे रा. कन्हेरवाडी ता. परळी जि बीड पीडीत महिलांना बोलवून घेतात व स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. तसेच रुमची झडती घेतली असता ६ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे. नमुद आरोपी , पीडीत महिलेस स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बोलावून घेऊन, स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ ,प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे अंबाजोगाई उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मझहरअली सय्यद , सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद मेंडके पोठा परळी ग्रामीण, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव, अंकुश निमोने, महीला पोलीस हवालदार उषा चौरे, पोलीस हवालदार अशोक शिंदे, राजेंद्र मिसाळ, नवनाथ हारगावकर, रमेश तोटेवाड, तुळशीराम परतवाड, रावसाहेब मुंडे, विठ्ठल परजणे, पोलीस शिपाई योगेश निर्धार, महादेव केदार, सर्व नेमणूक पोठा परळी ग्रामीण व अ. मा. वा. प्र. कक्ष यांनी केली.

# पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकासासाठी युवकांचा सहभाग अनिवार्य : प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल

### तुलसी महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरात पाणलोट व्यवस्थापनावर डॉ.विजयकुमार बांदल यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ जानेवारी**

युवकांनी शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमिनीच्या विकासासाठी सक्रिय सहभाग नोंदवणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले.



तुलसी महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात शनिवार, दि. ३१ रोजी मौजे शिवणी येथे 'शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकासासाठी युवा' या थीमखाली आयोजित सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या बौद्धिक सत्रात ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर वाघमारे, प्रा. सुरेश वाघमारे, प्रा. श्वेता वंजारे, प्रा.ऋषाली लोखंडे, प्रा. मगन ओव्हाळ तसेच अभय इंगोले उपस्थित होते.पुढे बोलताना डॉ.बांदल म्हणाले की, पाणलोट व्यवस्थापनामुळे जलस्रोतांची वाढ होऊन शेतीला मोठा फायदा होतो. पडीक जमिनीचा योग्य विकास केल्यास उत्पादनक्षमता वाढून ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता सामाजिक आणि पर्यावरणीय जाणीव ठेवून प्रत्यक्ष कृतीतून समाजासाठी योगदान द्यावे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार, सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी केले, तर आभार प्रा. सुरेश कसबे यांनी मानले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, शिवणी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पंजाबच्या महिला सरपंचांनी दिली औंढा पंचायत समितीला भेट

## जिल्ह्यातील शाळा, गावे पाहून सरपंच महिला गेल्या भारावून



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

पंजाब राज्यातील महिला सरपंचाचे पथक औंढा नागनाथ तालुक्याच्या दौरावर आले आहे. यावेळी महिला सरपंचाच्या पथकाने सकाळी अकरा च्या दरम्यान औंढा नागनाथ येथील पंचायत समिती कार्यालयास भेट दिली. यावेळी त्यांनी पंचायत समिती मधील सर्व विभागाची पाहणी केली. त्यानंतर पंचायत समिती सभागृहामध्ये सहाय्यक प्रशासन अधिकारी राधेश्याम परंडकर यांनी शासनाच्या विविध योजनेची व पंचायत समिती मधील सर्व विभागाची सविस्तर माहिती सांगितली. तसेच हिंगोली तालुक्यातील शाळा व गावांना भेटी दिल्या. यावेळी शाळांची कामगिरी आणि गावांचा विकास पाहून या महिला सरपंच भारावून गेल्या.

औंढा नागनाथ पंचायत समितीमधील कृषी विभाग, आरोग्य विभाग शिक्षण विभाग, घरकुल योजना, बचत गटाची कार्य, बचत गट कसे तयार करणे,बचत गटाचा विकास, पंचायत समितीमधील आस्थापना विभाग, लेखा विभाग, रोजगार हमी विभाग तसेच पंचायत समितीमध्ये कार्यालयीन माहिती व शासनाच्या सर्व योजना यांची सविस्तर माहिती दिली.

देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी आठव्या स्थानावर असलेल्या हेमाडपंथी दगडी शिल्पकलेच्या नागनाथ मंदिरात भेट दिली. यावेळी आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूचे दर्शन घेऊन महापूजा केली. यावेळी सर्व पंजाब राज्यातील महिला सरपंचांनी हेमाडपंथी दगडी शिल्पकला व मंदिराची माहिती जाणून घेतली. यानंतर देवस्थानच्या वतीने सर्व महिला सरपंचाचा मंदिराची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. पंजाब राज्यातील महिला सरपंच पथकासोबत बीडीपीओ सुखप्रीत पालसिंग, जीआरएस सुखजिंदर सिंग यांच्यासह महिला सरपंच ४५ ते ५० होत्या.यावेळी पंचायत समिती चे सहाय्यक प्रशासन अधिकारी राधेश्याम परंडकर, विस्तार अधिकारी सय्यद जमीर, ग्रामपंचायत अधिकारी दामोदर गोरे, राम पायघन, देवस्थानचे व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, सुरक्षा गार्ड प्रमुख बबन सोनुने, कृष्णा पाटील, अंबादास कुहीरे, पिराजी हाके आदींची उपस्थिती होती.

# गुन्ह्यातील जप्त केलेला १० लाख ८५ हजारांचा मुद्देमाल केला परत

## सात पोलिस ठाण्यांतर्गत राबवली मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

जिल्ह्यातील सात पोलिस ठाण्यांतर्गत जानेवारी महिन्यात गुन्ह्यातील जप्त केलेला १० लाख ८५ हजारांचा मुद्देमाल पोलिस विभागाच्यावतीने तक्रारदारांना सन्मानपूर्वक परत करण्यात आला आहे. यामुळे तक्रारदारांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्यामध्ये चोरी गेलेला मुद्देमाल जप्त केला जात आहे. सदरील मुद्देमाल न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून तक्रारदारांना परत देण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. दर महिन्याच्या अखेरच्या दिवशी हा मुद्देमाल परत करण्यात येत आहे. दि ३१ जानेवारी रोजी जिल्ह्यातील सात पोलिस ठाण्यांतर्गत जप्त केलेला १० लारख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. या पोलिस ठाण्यांतर्गत पोलिसांनी १० गुन्हे उघडकीस आणले. हिंगोली शहर, वसमत शहर, गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत चोरीचे प्रत्येकी एक तर आखाडा बाळापूर, कळमनुरी पोलिस ठाण्यांतर्गत प्रत्येकी दोन गुन्हे उघडकीस आणले होते. यामध्ये सोने चांदी व रोख रक्कम असा एकूण ९ लाख ७५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याशिवाय हट्टा, वसमत शहर, कुरूंदा पोलिस ठाण्यांतर्गत दुचाकी चोरीचे तीन गुन्हे उघड झाले असून तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, दि ३१ जानेवारी रोजी सर्व पोलिस ठाण्यांमध्ये विशेष कार्यक्रम घेवून तक्रारदारांना चोरीला गेलेला ऐवज व दुचाकी वाहने परत करण्यात आले. यावेळी तक्रारदारांच्या चेहऱ्यावर समाधान व्यक्त झाले त्यांनी संबंधित पोलिस ठाण्याचे आभार मानले.

# जिल्हा व सत्र न्यायालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

येथील जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त शुक्रवार, (दि. ३०) रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश टी. एस. अकाली हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदर्श महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. महेश मंगनाळे तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड. श्रीधर एस. घुगे हे उपस्थित होते.

कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात टी. एस. अकाली यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्याचे महत्त्व विशद करून दैनंदिन कामकाजात मराठी भाषेचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. महेश मंगनाळे यांनी शासकीय व न्यायालयीन कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा अधिकाधिक वापर केल्यास सामान्य नागरिकांमध्ये मराठी भाषेबद्दल आपुलकी व अभिमान निर्माण होईल, असे सांगून विविध उदाहरणांच्या माध्यमातून मराठी भाषेचे महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ श्रीमती एस. एन. माने-गाडेकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ पी. जी. देशमुख, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ आर. एस. रोटे, मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती ए. बी. कुरणे, सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) श्रीमती व्ही. व्ही. सावरकर, द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) पी. जी. महाळकर, द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती डी. व्ही. भंडारी, तृतीय सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती एस. एस. पळसुले, यांच्यासह जिल्हा न्यायालयातील विधिज्ञ, न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) वि. म. मानखैर यांनी केले.



**हिंगोली- येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात ऑपरेशन मुस्कान अंतर्गत महिला व बालकांच्या सुरक्षेकिरता कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी पोलिस अधीक्षक निलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय अधिकारी राजकुमार केंद्रे, पोनि दत्ता केंद्रे, सपोनि प्रेमलता जगताप, सपोनि शिवसांब घेवारे, प्रदीप झुंगरे, सीमा पाटील, नंदा घोंगडे, वर्षा शिंदे, रविना घुमनर. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### बौध्द समाजातील संस्थांसाठी पायाभूत सुविधांकरिता अनुदान योजना

हिंगोली- धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा अधिक बौद्ध समाजातील विश्वस्त/सदस्य असलेल्या तसेच बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाच्या दि. ७ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाअन्वये सन २०२५-२६ या वर्षासाठी अनुदान योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत पात्र संस्थांना १० लाख रुपयापर्यंत अनुदान देण्यात येणार असून, दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेली योजनेची कार्यपद्धती, पात्रता, अटी व शर्ती कायम राहतील. तसेच शासन निर्णयात नमूद केलेल्या पायाभूत सोयी-सुविधांसाठीच अनुदान देण्यात येणार आहे. हे अनुदान प्राप्त करण्यासाठी इच्छुक शैक्षणिक व सामाजिक संस्थांनी दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या विहित नमुन्यातील प्रपत्र-१, प्रपत्र-२, प्रपत्र-३ व प्रपत्र-५ मध्ये आवश्यक माहिती संगणकीकृत स्वरूपात भरून, शासन निर्णयात नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून सविस्तर प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. विहित मुदतीनंतर जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, असे जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी, हिंगोली यांनी कळविले आहे.

### हज यात्रानिमित्त लसीकरण, आरोग्य तपासणी



हिंगोली- जिल्हा रूग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि खिदमतुल हुज्जाज कमेटीच्या संयुक्त विद्यमाने आज हज यात्रा २०२६ लसीकरण व आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबीराच्या अध्यक्षस्थानी हाजी इरफान तर प्रमुख पाहुणे म्हणून अधिष्ठाता चक्रधर मुंगल, डॉ नितीन तडस, डॉ गोपाल कदम, डॉ फैसल पठाण, डॉ मनीष बगडीया, बालासाहेब चिंचकर, पहुरकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सन २०२६ हज यात्राकरिता ११८ हज यात्रेकरू मक्का मदीना सौदी अरेबिया येथे यात्रेसाठी जाणार आहेत. त्यांची मोफत आरोग्य तपासणी व लसीकरण करण्यात आले. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी हाजी सय्यद इकबाल वासेसा, सलीम, महम्मद कलीम शेख, हाजी इरफान, हाजी पठाण असगर, मुफ्ती अब्दुल कदीर, डॉ जहीरोद्दीन, हाजी सय्यद इब्राहीम, डॉ मुंतजीब, अश्रफ पठाण, सय्यद शकील, शेख शाहीद, हाजी कैसर, नाजीम रिझवी आदींनी परिश्रम घेतले.

# आदर्शच्या रासेयोच्या वार्षिक शिबीरात विविध उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

येथील आदर्श महाविद्यालयाच्यावतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक शिबिर मौजे चिंचोली ता. जि. हिंगोली येथे २३ जानेवारी ते २९ जानेवारी२०२६ दरम्यान आयोजित केले होते. यावेळी विविध उपक्रम राबविण्यात आले.

दि. २५ जानेवारी २०२६ रोजी दुपारच्या बौद्धिक सत्रांमध्ये प्रा. डॉ. राजाराम पिंपळपल्ले यांनी 'पंडित दीनदयाल उपाध्याय एकात्मिक मानवता दर्शन' या विषयावर माहिती पूर्ण व्याख्यान देऊन विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. मराठवाडा बाल रुग्णालय नांदेड व विपश्यना केंद्र चिंचोलीचे विपश्यणा प्रशिक्षक डॉ. संग्राम जोंधळे यांनी 'व्यक्तिमत्व विकासात विपश्यना साधनेची भूमिका' या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. यानंतर अनापानाचे सत्र घेऊन प्रश्नोत्तर घेण्यात आले. दि. २७ जानेवारी २०२६ रोजी हिमोग्लोबिन व सी बी सी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याचा लाभ ग्रामस्थांनी घेतला. दुपारच्या बौद्धिक सत्रा मध्ये प्रा. डॉ. सत्यजित चव्हाण यांनी ' वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. भागवत पंडित यांनी 'रोजगारांच्या विविध संधी' या विषयावर उद्बोधन केले. सेवानिवृत्त प्राचार्य डी. एन. केळे यांनी :व्यक्तिमत्व विकास' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.दि. २८ जानेवारी रोजी हेडगेवार दंत महाविद्यालयाच्या वतीने दंतरोग तपासणी करण्यात आली. जिल्हा परिषद प्रशालाचे विद्यार्थी, गावकरी व रासेयो स्वयंसेवक यांनी दंत तपासणी करून घेतली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या दुःखद निधनाच्या पार्श्वभूमीवर जाहीर झालेल्या तीन दिवसीय शासकीय दुखवट्यामुळे २९ जानेवारी २०२६ चा राष्ट्रीय सेवा योजनेचा समारोप कार्यक्रम रद्द करण्यात आला व दिवंगत अजितदादा पवार यांना सामूहिकरित्या भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सचिन हाटकर, प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे, प्रा. सुरेश वऱ्हाड , प्रा. डॉ.महेश मंगनाळे व महाविद्यालयीन कर्मचारी श्री दुर्गादास टापरे, शेख जावेद व स्वयंसेवकांनी शिबिर यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# देश महासत्ता होण्यासाठी युवकांचे योगदान- शिवाजी मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

देशाला महासत्ता बनविण्यामध्ये देशातील युवकांचे मोठे योगदान आहे. देशात सुरू असलेल्या मानवी तस्करी विरोधात युवकांनी उभे ठाकले पाहीजे, असे मत भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी व्यक्त केले.

येथील भारतीय विद्या मंदिर शाळेत दि ३१ जानेवारी रोजी वर्क फॉर फ्रिडम रॅलीचे उद्घाटन शिवाजीराव मुटकुळे यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, माजी जि प सदस्य अॅड अमोल जाधव, पर्यवेक्षक भारत शिंदे, संस्थचे केंद्रे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी केंद्रे यांनी मानवी तस्करी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची जनजागृतीपर रॅली शहरातून काढण्यात आली.

# हिंगोलीत वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे राज्य अधिवेशन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे प्रश्न शासन दरबारी मांडून वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी राज्य अधिवेशनात दिले.

येथील महाविर भवनात वृत्तपत्र विक्रेता संधटनेचे दोन दिवशीय राज्य अधिवेशनाला सुरूवात झाली असून या अधिवेशनाचे मोठ्या थाटात उद्घाटन करण्यात आले. वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने मागील अनेक वर्षापासून स्वतंत्र कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात यावी या मागणीसह इतर मागण्या प्रलंबीत आहेत. या मागण्या शासनाने तत्काळ मंजुर कराव्यात अशी मागणी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली.

यावेळी संघटनेचे राज्याध्यक्ष पाटणकर, बालाजी पवार, भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, सुभाष अपूर्वा, जिल्हाध्यक्ष राजेंद्र हलवाई, हरिश किर्तीवार, संदीप पाचमासे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे राज्यातील विविध जिल्ह्यातून मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पवार पब्लीक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जानेवारी**

येथील पवार पब्लिक इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांची शैक्षनिक सहल संभाजीनगर येथे गेली असता यात ६८ विद्यार्थी सहभागी झाले होते. विविध ऐतिहासिक माहिती, प्राणी संग्रहालय पाहून आनंद व्यक्त केला.

येथील पवार पब्लिक स्कुल येथील विद्यार्थ्यांची संभाजीनगर येथे शैक्षणिक सहल नेण्यात आली होती. या सहली मध्ये शाळेतील जवळपास ६८ विद्यार्थ्यांचा आणि काही शिक्षकांचा समावेश होता. या सहलीच्या दरम्यान मुलांना दोन दिवस महाराष्ट्रातील ऐतिहासिक वास्तू दाखविण्यात आले. प्रारंभी भौगोलिक लोणार सरोवर दाखवण्यात आले. त्यानंतर राष्ट्रमाता आई जिजाऊ यांचे जन्मस्थान सिंदखेडराजा येथे भेट दिली. त्यानंतर संभाजीनगर मधील जागतिक वारसा स्थळ असलेले वेरूळ लेणी, दौलताबाद किल्ला, बीबी का मकबरा तसेच बौद्ध लेणी ठिकाणांना भेट देऊन त्याबद्दल ऐतिहासिक माहिती देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना सिद्धार्थ गार्डन मध्ये असलेले प्राणिसंग्रहालयात नेऊन मुलांनी आज पर्यंत फक्त पुस्तकांमध्ये पाहिलेले पक्षी आणि अनेक प्राणी हे प्रत्यक्ष दाखवण्यात आली. तेव्हा मुलांच्या चेहऱ्यावरील उत्साह द्विगुणित झाला. सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना किल्याची आणि इतर माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यामध्ये समाधान झाले.

# रेती वाहतुक करणाऱ्या भरधाव टिप्परने दुचाकीस्वारांना चिरडले

## एकाचा जागीच मृत्यू, दुसरा गंभीर जखमी



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ३१ जानेवारी-**
माहूर लगतच्या महागाव तालुक्यातील हिवरा संगमजवळ राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर आज शनिवारी (दि. ३१) दुपारी १ वाजताच्या सुमारास रेती वाहतूक करणाऱ्या भरधाव टिप्परने दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत अंबोडा (ता. महागाव) येथील देवानंद दिलीप दोडके या युवकाचा टिप्परच्या चाकाखाली चिरडून जागीच मृत्यू झाला, तर शुभम उकंडा पाटे हा युवक गंभीर जखमी झाला आहे. विशेष म्हणजे याआधीही गुरुवारी याच ठिकाणी झालेल्या अपघातात एका दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

एकविरा देवी मंदिर परिसराजवळ झालेल्या या अपघाताची तीव्रता इतकी भयानक होती की, दुचाकीस्वार देवानंद दोडके याचा टिप्परच्या चाकाखाली अक्षरशः चेंदामेंदा झाला. रेतीने भरलेला टिप्पर रस्त्याच्या कडेला असलेल्या विद्युत पोलच्या तणाव्याला अडकला असून त्याचे समोरचे चाक निखळून पडले आहे.

अपघातानंतर टिप्परचालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. अपघातात जखमी झालेल्या शुभम पाटे यास माहूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले. देवानंद दोडके याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सवणा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

अपघाताची माहिती मिळताच हिवरा येथील सर्पमित्र आशिष हातमोडे, विवेक कदम यांनी प्रसंगावधान राखत जखमीला खासगी वाहनातून तातडीने रुग्णालयात हलविले. ग्रामपंचायत सदस्य राजू धोतरकर आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी मदत केली. ठाणेदार धनराज निळे, महामार्ग पोलीस मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक किशोर गवई यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. गुरुवारनंतर याच ठिकाणी झालेला हा दुसरा अपघात असून, दोन्ही अपघातात दुचाकीस्वारांचा मृत्यू झाल्याने नागरिकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, भरधाव वेगात असलेल्या टिप्परचा पाठलाग यवतमाळ आरटीओकडून सुरू होता. आरटीओ ला चकमा देऊन पळ काढण्याच्या इराद्याने चालक प्राणघातक वेगाने टिप्पर पळवत होता. पाठलागादरम्यानच हा अपघात घडल्याचा कयास व्यक्त केला जात असून, अपघातानंतर आरटीओ पथक घटनास्थळी न थांबता महागावच्या दिशेने निघून गेल्याचे हजारो नागरिकांनी पाहिल्याचा दावा केला जात आहे. अपघातानंतर नागरिकांनी तात्काळ मदतकार्य सुरू केले. मात्र, महामार्गावर सुरू असलेली बेशिस्त रेती वाहतूक रोखण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

## जांभळ्याच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम तीन वर्षानंतरही अपूर्णच



**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. ३१ जानेवारी-**
जांभळा येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम तीन वर्षानंतरही पूर्ण झाले नसल्याच्या व बांधकामाचा दर्जा ढासळल्याच्या तक्रारी वाढल्या असून दवाखाना बांधकामाची तात्काळ चौकशी करावी. संबंधित गुत्तेदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी. अशी मागणी पशुपालकातून पुढे आली असून दवाखान्याच्या अर्धवट बांधकामामुळे पशुपालकांचे हाल होत आहेत.

हदगाव तालुक्यातील आदिवासीबहुल कृष्णापूर, रावणगाव, डाक्याचीवाडी, धन्याचीवाडी, शेंदण, राळावाडी, ठाकरवाडी गावच्या पशूंचे आरोग्य सांभाळणाऱ्या जांभळा येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी - २ च्या नवीन इमारतीसाठी शासनाने जिल्हा वार्षिक योजना - आदिवासी उपयोजना २०२२ - २३ अंतर्गत सुमारे ४३ लाख रुपयाचा निधी मंजूर करूनही बांधकाम होत नसल्याच्या तक्रारी वाढल्याने संबंधित गुत्तेदाराने इमारतीचे बांधकाम केले. मात्र दवाखान्यातील बरीच कामे अर्धवट ठेवून ईमारतीची रंगरंगोटी करून गुत्तेदार मोकळे झाले. सध्या रंगरंगोटीला 'काळे डाग' पडल्याने ईमारत नवी की जुनी? असा प्रश्न उपस्थित होत आहे. नूतन ईमारत आजूनही दवाखाना यंत्रणेला सुपूर्त केली नसल्याने दवाखाना कुलूपबंदच असल्याचे सांगण्यात येते. प्रस्तुत ईमारत बांधकामाला १३ मार्च २०२३ ला प्रशासकीय मान्यता व २८ एप्रिल २०२३ ला तांत्रिक मान्यता मिळाली होती. बांधकाम कालावधी बारा महिन्याचा होता. नूतन दवाखान्यात अद्यावत सोयी सुविधा देण्याची तरतूद अंदाजपत्रकात होती. परंतु दवाखाना बांधकामात अंदाजपत्रकाचा दूरदूरचा संबंध जुळत नसल्याने शासनाचे ४३ लाख रुपयांचा चुराडा झाल्याचे दिसते. सुशोभीकरण, पाणी, विद्युतीकरण, फर्निचर, औषधालय, लॅब, डॉक्टरांसाठी कॅबिन, स्टोअर रुम, वेटींग हॉल, संडास, बाथरूम अशी तरतूद असताना बरीच कामे अर्धवट सोडल्याचे पशुधन पर्यवेक्षकांनी सांगितले. संबंधित विभागाने बांधकाम पूर्ण न करता बांधकामाची बिलं डोळ्यावर पट्टी बांधून दिले काय ? असा संतप्त सवाल पशुपालकातून विचारला जातो. संबंधितांनी जांभळा येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या अर्धवट बांधकामाची चौकशी करून गुत्तेदार व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी पशुपालकातून पुढे आली असून निदान चालू वर्षात तरी दवाखान्याचे काम पूर्ण होईल का? असा प्रश्न जांभळेकरांना पडला आहे.

## भोकर बाजार समिती कडून अजितदादा पवार यांना श्रध्दांजली

**भोकर -** डॉ.शंकरराव चव्हाण कृषि उत्पन्न बाजार समिती संचालकाची दि.३० रोजी सभा आयोजीत करण्यात आली होती. यावेळी सभापती उपसभापती सह सोळा संचालकांची उपस्थिती होती सभेपूढिल विषय घेण्यापूर्वी उपमूख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघाताने दूर्दे वी निधन झाल्यामूळे बाजार समितीचे संचालक रामचंद्र मूसळे यांनी आपल्या मनोगतात अजित दादा सारखा नेता महाराष्ट्रात यापूढे होणे शक्य नाही असे म्हणाले संचालक विश्वांभर पवार यांनी मनोगत व्यक्त करताना त्यांच्या डोळ्यातून अश्रू आनावर झाले दादाच्या अशिर्वादामूळेच बाजार समितीमध्ये आलो व दादाच्या आशिर्वादानेच आज मी उभा आहे अशी भावना व्यक्त केली बाजार समितीचे सभापती जगदिश पाटील भोसीकर यांनी देखील दादाबद्यल मनोगत व्यक्त करताना म्हणाले की दादा कोणत्याही पक्षाचे असो त्यांचे भाषण ऐकण्यात फार आनंद होत होता वैचारीक बोलत होते असे म्हणाले यावेळी बाजार समितीचे सर्व संचालक सर्व कर्मचारी उपस्थित राहून कै.अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहीली.

## सुभाष खाडेंना भीमयोध्दा पुरस्कार जाहीर

**लोहा, दि. ३१ जानेवारी-**
बुद्धकिर्ती चॅरिटेबल ट्रस्ट नांदेडच्या वतीने देण्यात येणारा व अतिशय सन्मानाचा समजला जाणारा भीमयोद्धा पुरस्कार यावर्षी लोहा येथे समता सैनिक दलामध्ये सामाजिक कार्य करत असलेल्या सुभाष विठ्ठल खाडे यांना जाहीर करण्यात आला आहे. ३१ जानेवारी रोजी सायंकाळी रमाई बुद्ध विहार सहयोगनगर, नांदेड येथे एका भव्य सोहळ्यामध्ये या पुरस्काराचे वितरण होणार आहे. रमाई बुद्ध विहार सहयोग नगर येथे स्टार प्रवाहाचे छोटे उस्ताद गायिका अंजली गडपाळे आणि सुप्रसिद्ध गायक सुरेश रंजवे यांच्या बुद्ध भिम गिंताचा कार्यक्रम ही होणार आहे या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. अशी माहिती बुद्ध किर्ती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष रमेश कोकरे, सचिव राजेश बि-हाडे, सहसचिव प्रविण कुपटिकर, कोषाध्यक्ष सुभाष मल्हारे, सदस्य रमेश सुर्यवंशी, भिमराव सोनाळे, साहेबराव पुंडगे यांनी जाहीर केले. या निवडी बद्दल लोहा भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष बापूसाहेब कापुरेसह आंबेडकर चळवळीतील अनेकांनी सुभाष खाडेचे अभिनंदन केले.

## राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेत उमरी मॉडर्न इंग्लिश स्कूलचे यश

**उमरी -** अमरावती येथे ज्युनियर बेसबॉल राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात आली त्या स्पर्धेत उमरी शहरातील मॉर्डन इंग्लीश स्कुलने कौतुकास्पद कामगीरी करून उमरी शहराचे नाव उज्जवल केले आहे . अमरावती येथे दिनांक २२ ते २३ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत बेसबॉल स्पर्धा घेण्यात आली महाराष्ट्र स्टेट बेसबॉल स्पर्धेत १९ व्या चॅम्पियनशिप स्पर्धा मध्ये उमरी येथील मॉडर्न इंग्लिश स्कूलचे इयत्ता १० वीचे विद्यार्थीनीं संघाने उत्तम कामगिरी करुन शाळेच्या वैभवात भर पाडली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी देखिल ह्याच खेळात चांगली कामगिरी केली आहे. सदरील स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथमच सहभाग नोंदविला होता. अमरावती येथून चांगली कामगिरी पार पाडून हे खेळाडू दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी उमरीस परत आले. उमरी रेल्वे स्थानकावर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. मॉडर्न इंग्लिश स्कूलचे ह्या संघात सोनल सुरबुलवाड, अक्षरा बिजमवार, साक्षी वाडीकर, श्रृती माचनवाड, वैभवी यम्मेवार, ऋदायणी बोडके, निहीता बुंदेलकर, ओंकार पवार, शौर्य उत्तरवार, ऋतुराज ढगे ह्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. शाळेच्या सहशिक्षिका सौ. निलिमा वर्मा यांनी संघाचे कोच म्हणून काम पाहिले. सदरील शाळेच्या विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स अधिकारी आनंदराव कांबळे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आहे व पालकांनी ही आनंद व्दिगनित केला आहे .

## शेंबोली आयुष्मान आरोग्य उपकेंद्रास क्वॉलिटी पॉलिसी लागू

**मुदखेड -** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शेंबोली येथील आयुष्मान आरोग्य उपकेंद्रात आरोग्य सेवांच्या दर्जात महत्त्वाची भर पडली आहे. भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार येथे क्वॉलिटी पॉलिसी व कार्य सूचना अधिकृतपणे लागू करण्यात आल्या आहेत. नांदेड जिल्ह्यातील सर्व उपकेंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके (छटड) प्राप्त करून देण्याचे उद्दिष्ट जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निश्चित करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने जिल्ह्यातील उपकेंद्रांमध्ये रुग्णकेंद्रित, सुरक्षित व दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविण्यात येत आहेत. उपकेंद्र स्तरावर नागरिकांना १३ प्रकारच्या आरोग्य सेवा पूर्णतः मोफत दिल्या जातात. या सेवांमध्ये गुणवत्ता, सुरक्षितता व पारदर्शकता राखण्यासाठी तयार करण्यात आलेल्या क्वॉलिटी पॉलिसी व कार्य सूचना आता प्रत्यक्ष अंमलात आणण्यात आल्या आहेत. या संपूर्ण प्रक्रियेसाठी जिल्हा नोडल अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय कासराळीकर तसेच समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अंकुश गोवंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे शेंबोली आयुष्मान आरोग्य उपकेंद्रातील सेवा अधिक सक्षम, विश्वासार्ह व गुणवत्तापूर्ण ठरणार असून ग्रामीण भागातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळण्याचा मार्ग सुकर झाल्याची प्रतिक्रिया आरोग्य विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

## स्व.अजितदादांना नांदेडमध्ये सर्व पक्षीयांकडून श्रद्धांजली

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ जानेवारी-**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे अकाली निधन झाले. त्यांना सर्व पक्षीय मान्यवर व पदाधिकाऱ्यांकडून शंकराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



या शोकसभेस सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, पदाधिकारी व स्व.अजित दादांवर प्रेम करणाऱ्या जनतेनी उपस्थित रहावे, असे आवाहन सर्व पक्षीय शहर जिल्हाध्यक्षांनी संयुक्तरित्या करण्यात आले होते.

या शोकसभेत माजी मंत्री कमलकिशोर कदम, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी मंत्री डॉ.माधवराव पाटील किन्हाळकर, नांदेड लोकसभेचे खासदार रवींद्र चव्हाण, नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, सुरेशदादा गायकवाड, प्रा.यशपाल भिंगे, प्रवीण पाटील चिखलीकर, बबनराव बारसे, प्रवीण साले, राजेश पावडे, माजी महापौर अब्दुल सत्तार, हर्षद शहा, वंचित आघाडीचे फारूख अहमद, शेतकरी संघटनेचे गुणवंत पाटील हंगरगेकर, माजी महापौर सौ.जयश्रीताई पावडे, प्रशांत इंगोले, मराठा सेवा संघाचे श्याम पाटील वडजे, छावा संघटनेच्या वतीने दशरथ पाटील कपाटे, शिवसेनेच्या माजी नगरसेविका सौ.अर्पणाताई नेरलकरयांच्यासह अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार अविनाशराव घाटे माजी आमदार सुभाषराव साबणे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रामगावकर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कार्याध्यक्ष माधव पावडे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बालाजी शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ग्रामीण उत्तर जिल्हाध्यक्ष स्वप्नील इंगळे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष मोहसीन खान पठाण यांच्यासह विविध पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन अधिकारी केल्याचा आनंद सर्वश्रेष्ठ : न्या. वेदपाठक



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३१ जानेवारी-**
सिडको परिसरातील राजश्री पब्लिक स्कूल लातूर रोड नांदेड येथे दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणास आलेले प्रमुख अतिथी न्यायाधीश सुनील वेदपाठक यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.तेव्हा विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन अधिकारी केल्यास त्यांच्या आई-वडिलांना व गुरुजनांना जो आनंद मिळतो तो सर्वश्रेष्ठ आनंद असतो असे मत व्यक्त केले.

सिडको परिसरातील राजश्री पब्लिक स्कूल लातूर रोड नांदेड येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण सुभाष रामराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषण, सांस्कृतिक कार्यक्रम व वार्षिक अंक हस्तलिखित प्रकाशित करण्यात आले. वरील सर्व क्षेत्रात सहभाग नोंदल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सध्याच्या युगात पुस्तकी ज्ञान व स्पर्धात्मक ज्ञाना सोबतच व्यावहारिक व व्यावसायिक ज्ञान असणे हे किती गरजेचे आहे. या आनंदनगरी व्यवसायातून लक्षात येते. याआनंद नगरी उपक्रमाचे उद्घाटन जिल्हा मुख्य न्यायाधीश सुनील वेदपाठक व त्यांच्या पत्नी सौ. अर्चनाताई वेदपाठक यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळण्यासाठी शिक्षण, संस्कार, शिस्त, व्यायाम व आरोग्य या सर्व गोष्टी शाळेमध्ये आवर्जून घेतल्या जातात. यावेळी या कार्यक्रमास परिसरातील नवनिर्वाचित नगरसेवक सौ. अनुराधा काळे, सौ.दिपाली मोरे,सौ. सुवर्णा बस्वदे, राजू लांडगे, गंगाप्रसाद काकडे, वैजनाथ देशमुख, अभिषेक सौदे यांची प्रमुख उपस्थिती होती.दरम्यान शाळेच्या संचालिका सौ. डॉ. कल्पना पाटील, सचिव दिलीप पाटील, इंजि. अनुराग पाटील, व्यवस्थापक सुशांत पाटील तोरणेकर, सौ धनश्री तोरणेकर, सौ अश्विनी देशमुख, मुख्याध्यापक ज्ञानोबा मुंडे, मंदार खोसे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.तर यावेळी आनंद नगरीतील सहभागी विद्यार्थ्यांचे उभारलेले ६९ स्टॉल मधून मिळालेली खरी कमाईची रक्कम लक्षणीय ८७ हजार ७२० येवडी झाल्यांयाने विद्यार्थ्यांचे सर्व मान्यवरांनी कौतुक केले.

## सुंडगी जि.प. शाळेत स्वच्छतागृहच बंद!, थेट आमदार अंतापुरकरांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ३१ जानेवारी-**
देगलूर (प्रतिनिधी) : देगलूर तालुक्यातील मोजे सुंडगी बु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील (इयत्ता पहिली ते पाचवी) स्वच्छतागृह अनेक दिवसांपासून मोडकळीच्या अवस्थेत असून सध्या पूर्णतः बंद आहे. त्यामुळे शाळेतील महिला शिक्षिका, शिक्षक तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छतागृहाअभावी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



स्वच्छतागृहाची स्वतंत्र इमारत असूनही दुरुस्तीअभावी ती वापरात नसल्याने विशेषतः विद्यार्थिनी व महिला कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर व शालेय वातावरणावर होत असल्याचे चित्र आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी सौ. सत्यभामा भीमराव दिपके (रा. मोजे सुंडगी बु.) यांनी देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार जितेश अंतापुरकर यांना लेखी निवेदन सादर करून स्वच्छतागृह दुरुस्ती व नूतनीकरणासाठी निधी मंजूर करून सदर स्वच्छतागृह तात्काळ कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षितता व शिक्षण लक्षात घेता या विषयावर तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थ व पालकांकडून होत आहे.

## संत रविदास महाराज यांच्या जयंती निमित्त भव्य शोभा यात्रेत सहभागी व्हावे :सुभाष दुधंबे

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३१ जानेवारी-**
राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हा नांदेड च्या वतीने संत शिरोमणी जगद्गुरु रविदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंती महोत्सव निमित्त सर्व चर्मकार समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघ प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड, मुदखेड तालुकाध्यक्ष सुभाष दुधंबे यांनी केले आहे.

संत शिरोमणी जगद्गुरु रविदास महाराज प्रेमी व चर्मकार समाज बांधव यांना कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हा नांदेड च्या वतीने संत शिरोमणी जगद्गुरु रविदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंती महोत्सवा निमित्त दि. ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे ही शोभायात्रा महात्मा फुले पुतळा आय. टी. आय. पासून सकाळी ठिक ११ वाजता सुरुवात होणार आहे शक्तीनगर नांदेड येथे आपल्या सर्वांच्या सहकार्याने व आपल्या उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहात विसर्जित होणार आहे. तरी सर्व चर्मकार समाज बांधवांनी आपआपली दुकाने, प्रतिष्ठान बंद ठेऊन व कर्मचारी बांधवांनी एक दिवसाची रजा घेऊन कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने चर्मकार समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघ प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड,मुदखेड तालुकाध्यक्ष सुभाष दुधंबे यांनी केले आहे.

## केरबाजी गायकवाड यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ३१ जानेवारी-**
मुखेड तालुक्यातील ग्राम चांडोळा येथील सामाजिक, राजकीय कार्यकर्ते केरबाजी सटवाजी गायकवाड यांना नुकताच कर्नाटक राज्यातील गुलबर्गा

येथे सामाजिक, राजकीय योगदानाबद्दल 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पुरस्कार' भव्यदिव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला. मेक्सिकोतील युनिव्हर्सिटी तळोसा या विद्यापीठ संस्थेच्या वतीने त्यांना सामाजिक रत्न पुरस्कार देऊन मान्यवर पदाधिकाऱ्यांकडून सन्मानित करण्यात आले.

# पोलिस व महसुल विभागाकडून अवैध रेती उपसा करणारे साहित्य नष्ट

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३१ जानेवारी-**
मुदखेड तालुक्यातील महसूल व पोलीस प्रशासनामार्फत आज सकाळी वासरी, शंखतिर्थ व टाकळी परिसरातील गोदावरी नदीपात्रातील चार फायबर बोट, तिन लहान बोट जिलेटीनच्या सहाय्याने उडविण्यात व दोन थर्माकॉलचे तराफे आल्या तसेच एक वाहन अवैध रेती वाहतूक करीत असलेले पोलिस ठाणे मुदखेड येथे लावण्यात आले. यामध्ये जवळपास रु.९५ लाख ३०हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.



दि. ३१ जानेवारी रोजी सकाळी ०६.०० वाजता मातासाब गुरूद्वारा, मुगट परिसरात तहसिल कार्यालयामार्फत गोदावरी नदीपात्रात बोट टाकण्यात आली. त्यामध्ये वासरी व शंखतिर्थ येथील गोदावरी नदीपात्रामध्ये अवैध रेती उपसा करणा-या तिन मोठया फायबर बोट व तिन छोट्या बोट आढळून आल्या. सदर पकडण्यात आलेल्या बोटी ह्या जिलेटीनच्या सहाय्याने नदीपात्रातच उडविण्यात आल्या. यामध्ये तिन फायबर बोट ज्यांची अंदाजीत किंमत रु.६० लक्ष व तिन छोट्या बोट अंदाजीत किंमत रु.१५ लक्ष, वाळु साठवणूकीसाठी असलेले थरमाकॉलचे दोन तराफे ज्यांची किंमत अंदाजीत रु.३० हजार असे साहित्य जिलेटीनच्या सहाय्याने उडविण्यात आले. तसेच एक वाहन ज्याचा क्रमांक MH-२६ /BE-५५०१ तो अवैध रेतीची वाहतूक करतांना मुगट ते ब्राम्हणवाडा रस्त्यावर आढळून आला त्यास सुध्दा पुढील दंडात्मक कार्यवाहीस्तव पोलीस स्टेशन मुदखेड येथे लावण्यात आले. सदरची कार्यवाही केल्यानंतर टाकळी येथील गोदावरी नदी पात्रामध्ये एक फायबर बोट रेतीचा अवैध उपसा करतांना आढळून आल्याने ती सुध्दा जिलेटीनच्या सहाय्याने उडविण्यात आली. आज केलेल्या कार्यवाहीमध्ये एकुण रु.९५ लाख ३० हजार एवढ्या मुद्देमालाचे नुकसान झाले आहे.

सदरची कार्यवाही ही जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, उपविभागीय अधिकारी प्रविण मेंगशेट्टी, तहसीलदार आनंद देऊळगांवकर, नायब तहसीलदार मारोतराव जगताप, संतोष कामठेकर, विजयकुमार पाटे, सहा.महसूल अधिकारी शाम चौधरी,मंडळ अधिकारी अंजली बार्शिकर, गोपाल माने, विश्वनाथ बोधमवाड, राजू चव्हाण, राजकुमार मस्के, बाबुराव मुळेकर, मनोज वाघमारे, संताजी देवापूरकर,प्रसाद पांडे, सविता कल्याणकर, रंजना दमकोंडवार, तसेच पोलीस विभागातील सहा.पोलीस निरिक्षक बी.आर.रकांबळे, पोलीस उपनिरिक्षक एस.एस.शिंदे, अंगद कदम,पो.हे.कॉ.महेश कवठेकर, पो. हे.कॉ. राठोड, पो.हे.कॉ. साखरे,पो. हे.कॉ, देशमुख, पो.हे.कॉ.आडे, पो.हे.कॉ. पुणेबईनवाड, पो.हे.कॉ, कैलास भांगे, सुल्तान पठाण महसूल सेवक व भावेश्वर मुंगल यांनी कार्यवाही पुर्ण केली. सदर अवैध उत्खननाबाबत मारोतराव जगताप, नायब तहसिलदार यांनी पोलीस ठाणे मुदखेड येथे गुन्हा नोंदविला आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, ग्रामपंचायत साखरा आणि दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष युवक शिबिर सांगता समारंभ साखरा ता. जि. लातूर येथे आयोजित करण्यात आले होते. ध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव उपाध्यक्ष नरसिंह देशमुख होते तर मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सदस्य भीमराव शिंदे, डॉ. दशरथ भिसे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, मुख्याध्यापक स्वामी, गायकवाड यांची उपस्थिती होती.

डॉ. दशरथ भिसे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. युवकांनी समाजाशी जोडलेले राहून राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. सेवा, शिस्त आणि समर्पण या मूल्यांचा अंगीकार केल्यास विद्यार्थी खऱ्या अर्थाने जबाबदार नागरिक घडू शकतात, असे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे म्हणाले, विशेष शिबिराच्या यशस्वी आयोजनात गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. निवास, भोजन तसेच उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी गावकऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरेशकुमार कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. माना गायकवाड यांनी केले.



# जि. प. च्या शाळा- विद्यार्थ्यांचे आता होणार सोशल ऑडिट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :**

जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचे आणि शाळांचे सोशल ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, समग्र शिक्षा अभियानांतर्गत केंद्राद्वारे शाळांना मोफत पुस्तके, गणवेश व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी साहित्य खरेदीस दरवर्षी मोठी रक्कम दिली जाते. एवढा खर्च करूनही शैक्षणिक गुणवत्ता वाढत नसल्याचा सरकारला संशय आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

दरवर्षी नव्या शैक्षणिक वर्ष प्रारंभाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश दिली जातात. शिक्षणाचा दर्जा, गणवेशाचा दर्जा, शिक्षक कसे शिकवतात, साहित्य-सामग्री आहे का, अशा अनेक मुद्दे सोशल ऑडिटमध्ये पाहिले जाणार आहेत. समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळांसह खाजगी शाळांनाही मोफत पुस्तके, गणवेश दिले जातात. दरवर्षी यावर मोठी रक्कम खर्च केली जाते. या रक्कमेचा योग्य विनियोग होतो का? हे राज्य सरकार पाहणार आहे. सोशल ऑडिट करण्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीसोबत करार केल्याचे सांगण्यात येत आहे. या सोशल ऑडिटमध्ये नेमके काय बाहेर येते? याकडे आता शिक्षण क्षेत्रातील अनेक दिग्गजांचे लक्ष लागले आहे.

विद्यमान परिस्थितीत जिल्हा परिषद शाळांचे हाल आहेत. पटसंख्येत झपाट्याने कमी येत आहे. अनेक जिल्ह्यात शिक्षक अतिरिक्त होत आहेत. मोजक्या गुणवंत शिक्षकांच्या शाळा सोडल्या तर गुणवत्तेबाबतही ऐसीतैसीच आहे. त्यामुळे सरकारला चिंता व्यक्त वाटत असून आता शाळा व विद्यार्थ्यांचे सोशल ऑडिट करून खर्च केलेल्या पैशातून नेमके काय साध्य झाले, याची शहनिशा करण्यात येणार आहे.



## विविध वृत्त...

### जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**लातूर:** चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिनी भीवाजी गव्हाणे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. अध्यक्षस्थानी सतीश येडले होते. प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस लायक पटेल, तुकाराम नरवाडे, बळीराम जाधव, दत्तात्रय बिराजदार, अमोल हुडगे, सोपान सूर्यवंशी, किशोर बिराजदार, संतोष तेलंगे उपस्थित होते. लायक पटेल यांनी आपल्या भाषणात जिजाऊ इंग्लिश स्कूलचा विस्तार पाहून कौतुक केले. पटेल यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी स्कूलचे संचालक तुकाराम नरवाडे, कैलास रेड्डी, व्यवस्थापकीय संचालक पिंकू मुख्याध्यापिका रेश्मा घोरवाडे, उपमुख्याध्यापिका कोरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख मुट्टे, परीक्षा विभाग प्रमुख रंजना हुडगे, क्रीडा विभाग प्रमुख दिपाली पारवे, भाग्यश्री कदम, प्रियंका काळे, प्रियंका शिंदे व विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

### अजितदादांना शहर भाजपाची श्रद्धांजली

तभा वृत्तसेवा

**लातूर:** लातूर शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.महाराष्ट्राच्या मातीशी नाळ जोडलेले आणि कार्यकर्त्यांना सदैव उपलब्ध होणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कायम राज्याच्या हिताचा आणि विकासाचा ध्यास घेतला होता. खऱ्या अर्थाने जनतेला समर्पित असणारे नेतृत्व आपण गमावले असल्याचे सांगून त्यांच्या सारखा नेता पुन्हा होणे नाही, अशा शब्दात लातूर भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी शोक सभेत श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### अनधिकृत वृक्षतोड थांबविण्याची मागणी

**लातूर:** लातूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत वृक्षतोड सुरू असल्याचे प्रकार समोर येत असून, यामुळे पर्यावरणाचा समतोल धोक्यात येत आहे. या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या वतीने वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यात अनेक ठिकाणी बेकायदेशीर वृक्षतोड सुरू असून याबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकारी ठोस कारवाई करत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे यामागे काही आर्थिक व्यवहार होत असल्याची शंका निर्माण झाली आहे. वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून अनधिकृत वृक्षतोड करणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याप्रकरणी लवकरात लवकर कारवाई न झाल्यास व्ही. एस. पँथर्सच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदनावर जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख, शाखा प्रमुख विनोद कांबळे, शहर उपाध्यक्ष युनूस शेख, महादेव शिंदे, तोफीक शेख, बाबा शेख, रोहन वाघमारे आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### परिमल विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

**लातूर:** परिमल माध्यमिक विद्यालय, लातूर येथे पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी या वार्षिक स्नेहसंमेलनात सहभाग घेऊन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी समीरसिंह साळवे हे होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, गोविंद घार, रामदास पवार, डि. एन. केंद्रे, निलेश राजमाने, परिमल शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जाधव बी. एस., प्राचार्य श्रीनिवास जाधव पाटील, मुख्याध्यापक सुमन पवार उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविकबी. एस. जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष समीर साळवी आणि प्रमुख पाहुणे तृप्ती अंधारे यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त असे मार्गदर्शन केले. स्नेहसंमेलनात वार्षिक विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आनंदी वातावरण होते. अनेक विद्यार्थ्यांनी अप्रतिम कलांचे सादरीकरण या कार्यक्रमात सादर केले.

# निवडणुकीच्या कामावरील १ हजार २४६ शिक्षकांची मतदानाच्या दिवशीच परीक्षा; प्रशासनापुढे पेच

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :**

लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ गटासाठी व १० पंचायत समित्यांच्या ११८ गणांच्या सदस्य पदाच्या निवडीसाठी दि. ५ फेब्रुवारी रोजी मतदान, ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार होती. मात्र राज्यात उदभवलेल्या राजकीय परिस्थितीमुळे निवडणूक आयोगाने निवडणूकीच्या कार्यक्रमात बदल करून दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान व ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी घेण्याचा निर्णय घेतला. पण याच दिवशी निवडणुक जवळपास १ हजार २४६ शिक्षकांची सीटीईटी परीक्षा येत असल्याने निवडणूक विभाग प्रशासनासमोर नवा पेच निर्माण झाला आहे. सीटीईटी परीक्षेसाठी निवडणूक विभाग शिक्षकांना निवडणूकीच्या कामातून वगळणार का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.



जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ पार पाडणयासाठी जिल्हा परिषद शिक्षकांना निवडणूक आदेश प्राप्त झाले आहेत. परंतु निवडणूक आयोगाच्या फेरबदलामुळे ७ व ८ फेब्रुवारी शिक्षकांच्या सीटीईटी परीक्षा पार पडणार आहेत. त्या शिक्षकांची तांत्रीक आडचण निर्माण झाली आहे. शिक्षकांच्या तांत्रीक आडचणीचा विचार करून सीटीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सुट द्यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष परमेश्र्वर बालकुंदे व जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा विभागीय अध्यक्ष सुनीलकुमार हाके यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

या १० पंचायत समित्यांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी १ हजार ७५३ मतदान केंद्रावर ५ फेब्रुवारी रोजी मतदान, ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार होणार होती. त्यानुसार विविध पक्ष, त्यांचे उमेदवार, कार्यकर्ते प्रचाराच्या रणधुमाळीत रंगले असताना अचानक उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघात अचानक निधन झाल्याने सर्वच यंत्रणावर त्याचा परिणाम झाला.लातूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १० गट व २० गणासाठी दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. याच दिवशी निवडणूक प्रक्रीयेत सहभागी असलेले ३४७ शिक्षक परीक्षा देणार आहेत.

लातूर तालुक्यात निवडणुकीसाठी अतिशय माफक मनुष्यबळ आहे. लातूर जिल्हा परिषदेच्या १० गट व २० गणासाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान व ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणूकीत १ हजार ७५३ मतदान केंद्रावर १४ लाख ९९ हजार १९० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण १० हजार ५१८ अधिकारी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आले असून या कर्मचा-यांचे जवळपास दोन प्रशिक्षण पूर्ण झाले आहेत. तर तिसरे प्रशिक्षण हे मतदानाच्या एक दिवसापूर्वी आहे, त्यामुळे नविन कर्मचा-यांची नियुक्ती करतांना त्यांनाही दोन प्रशिक्षण निवडणूक विभागाला द्यावे लागणार आहेत. झाला. या निवडणूकीसाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रमात बदल करत ५ फेब्रुवारी रोजी होणारे मतदान आता ७ फेब्रुवारी रोजी, तर ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी घेण्याचा निर्णय घेतला.

केंद्र शासनाच्यावतीने दि. ७फेब्रुवारी रोजी शिक्षकांची सीटीईटी परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेस जिल्हयातील ५ हजार शिक्षक पात्र असून त्यापैकी १ हजार २७३ प्राथमिक शिक्षकांनी परीक्षेसाठी अर्ज केलेला आहे. त्यापैकी १ हजार २७ प्राथमिक शिक्षक, तर १२२ माध्यमिक शिक्षक निवडणूकीच्या कामात आहेत. उदगीर तालुक्याची संख्या अंदाजे ९७ ग्रहीत धरून एकूण प्राथमिक व माध्यमिक जवळपास १ हजार २४६ शिक्षकांची दि. ७ फेब्रुवारी रोजी सीटीईटी परीक्षा नांदेड, सोलापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर आदी ठिकाणी होणार आहे.

ज्या शिक्षकांची परीक्षा आहे. त्यांना या कामातून वगळावे लागणार आहे. निवडणूक विभागाकडे राखीव कर्मचारी असतात. तसेच जळकोट, देवणी, औसा, उदगीर या तालुक्यांना पुरेसे कर्मचारी आहेत. उर्वरित लातूर, निलंगा, शिरूर अनंतपाळ, चाकूर, अहमदपूर आदी तालुक्यांना मनुष्यबळाची गरज भासणार आहे. त्यामुळे बाजूच्या तालुक्यातील कर्मचाऱ्यांना निवडणूकीव्या कामासाठी घेण्याचा विचार आहे. तशी माहिती जिल्हाधिकारी यांना दिली असून चर्चा करून निर्णय घेतला जाणार असल्याचे उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी सांगीतले.

## ॲड. दीपक मठपती यांची भाजपच्या गटनेतेपदी निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीच्या वतीने गटनेतेपदी ॲड. दीपक मठपती यांची निवड करण्यात आली आहे.



प्रभाग क्रमांक १५ मधून दुसऱ्यांदा निवडून आलेले ॲड. मठपती यांच्या नावाच्या ठरावाला सूचक म्हणून याच प्रभागातील नगरसेवक प्रवीण कस्तुरे तर प्रभाग एकचे नगरसेवक ऋषिकेश राजे हे अनुमोदक आहेत. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला २२ जागांवर यश मिळाले. मागील निवडणुकीत ७० पैकी ३६ जागा जिंकलेल्या भाजपाला यावेळी सत्तेपासून दूर ठेवत काँग्रेसने वंचित आघाडीच्या सोबतीने तब्बल ४७ जागा जिंकल्या.

काँग्रेसच्या मनपा गटनेतेपदी विजयकुमार साबदे यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान, शुक्रवारी (दि. ३०) छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्तांकडे भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मनपातील पक्षाचे गटनेते म्हणून ॲड. दीपक मठपती यांच्या निवडीच्या ठरावाचे पत्र सादर केले. यावेळी भाजपचे नवनिर्वाचित सर्व सदस्य उपस्थित होते. २०११ ते २०१७ या काळात ॲड. मठपती यांनी मनपाचे विधी सल्लागार म्हणून काम पाहिले. त्यानंतर २०१७साली झालेल्या निवडणुकीत ते प्रभाग क्रमांक १५ मधून भाजपाच्या तिकीटावर नगरसेवक झाले. या कालावधीत शेवटचे तीन वर्षे त्यांनी स्थायी समितीचे सभापती म्हणूनही जबाबदारी पार पाडली. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत ॲड. मठपती पूर्वीच्याच प्रभागातून विजयी झाले आहेत.

मागील निवडणुकीत सत्ता स्थापन केलेल्या भारतीय जनता पार्टीने सुरुवातीच्या अडीच वर्षात जनहिताची अनेक कामे केली. शहर विकासासाठी विविध योजना राबविल्या. दुर्दैवाने पुढील अडीच वर्षात सत्तासमीकरणे बदलून फोडाफोडीचे राजकारण करुन काँग्रेसने पुन्हा सत्ता हस्तगत केली. पंचवार्षिक निवडणुकीच्या मुदतीनंतर बराच कालावधी मनपाचा कारभार निवडणुकीअभावी प्रशासकाकडे राहिला. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला अपेक्षित यश मिळाले नसले तरी, सत्ताधारी काँग्रेसच्या कारभारावर अंकुश ठेवत भाजपचे २२ सदस्य सक्षम विरोधकांची भमिका पार पाइत शहर विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने काम करतील, असा विश्वास भाजप, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला आहे.

## दयानंदमध्ये मतदान अधिकारी, कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण पूर्ण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी लातूर तालुक्यात ३०० मतदान केंद्र व २ लाख ५९ हजार ७५९ मतदार आहेत. क्षेत्रीय अधिकारी यांचे मार्फत सर्व मतदान केंद्राची तपासणी करण्यात आली असून मूलभूत सुविधांची पाहणी करण्यात आली आहे. मतदानासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी यांचे द्वितीय प्रशिक्षण दयानंद सभागृह लातूर या ठिकाणी पार पडले.

लातूर जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी तथा लातूर निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे -विरोळे, तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षणामध्ये मतदान अधिकारी कर्मचारी यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या ईव्हीएम मशीन ची माहिती मतदानाच्या दिवशी करावयाची रिपोर्टिंग मतदान केंद्राची रचना इत्यादी बाबींचे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. निवडणूक प्रक्रियेत सहभाग असणाऱ्या अधिकारी - कर्मचारी या सर्वांसाठी ईव्हीएम मशीन ची जोडणी व सिलिंग बाबतचे प्रात्यक्षिक दयानंद कला महाविद्यालयातील पहिल्या मजल्यावर मास्टर ट्रेनर क्षेत्रीय अधिकारी यांच्या उपस्थितीत देण्यात आले. ईव्हीएम मशीन ची प्रत्यक्ष हाताळणी करण्यामध्ये अधिकारी कर्मचारी यांचा उत्साह दिसून आला. तसेच प्रशिक्षणास मोठ्या प्रमाणात अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# ४०८ ग्रामपंचायतींवर येणार प्रशासकराज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** लातूर जिल्ह्यातील ४०८ ग्रामपंचायतींवर प्रशासक येणार असून, त्याची सुरूवात फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापासून होणार आहे. २०२६ पासून होणार आहे. मुंबई खंडपीठाच्या निर्देशानुसार मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून सरकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जाणार आहेत.




सद्यस्थितीत जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. या काळात ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणे शक्य नाही. या पार्श्र्वभूमीवर, आहे त्या सरपंचांना मुदतवाढ द्यावी, अशी मागणी पुढे आली होती. प्रस्तूत मागणीचा तिढा मुंबई खंडपीठात गेला. खंडपीठाने सरपंचांना मुदतवाढ न देता सरकारी अधिकारीच प्रशासक म्हणून नेमावा, असे निर्देश दिल्याने मुदतवाढीचा विषय कालबाह्य ठरला.

लातूर जिल्ह्यातील ४०८ ग्रामपंचायतींच्या सरपंचांची मुदत अनुक्रमे दि. ४, ६, ८, १० फेब्रुवारी २०२६ या चार टप्प्यांत संपुष्टात येत आहे. एवढ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्यास अधिकारी उपलब्ध असणे देखील महत्त्वाचे आहे. जिल्हा परिषद एका अधिकाऱ्याकडे किमान तीन ग्रामपंचायतींच्या प्रशासकाचा भार टाकण्याच्या विचारात आहे. प्रशासक म्हणून नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यास स्वतःचे मूळ काम करून प्रशासकाची धुरा सांभाळायची असल्याने मोठी कसरत होणार.मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका कधी जाहीर होणार, हेयाबद्दल आताच कोणालाही माहिती नाही. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर होतील. आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमाबद्दल लातूर जिल्हा परिषद प्रशासन किमान या क्षणाला तरी अनभिज्ञ असल्याचे दिसत आहे.

जिल्हा परिषदेंतर्गत कृषी, शिक्षण, पंचायत विभागात कार्यरत विस्तार अधिकारी, अन्य विभागांचे विस्तार अधिकारी किंवा शाखा अभियंता, आरोग्य अधिकारी-कर्मचाऱ्यांना मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रशासकासाठी अधिकारी-कर्मचारी कमी पडले तर इतर विभागातील अधिकारी - कर्मचाऱ्यांचा विचार होणार आहे. ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक संबंधित ग्रामपंचायतीचे सचिव म्हणून काम पाहतात. त्यांना प्रशासक म्हणून नियुक्त करता येत नाही. प्रशासक म्हणून नियुक्त होणारा अधिकारी-कर्मचारी ग्रामसेवकापेक्षा वरिष्ठ असला पाहिजे.

जि. प. अंतर्गत १४ विभागांसह अन्य सहा-सात उपविभाग आहेत. या सर्व विभागांतील अधिकारी-कर्मचारी प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात येतील, सरपंचांची मुदत फेब्रुवारी महिन्यात चार टप्प्यांत संपणार असल्याने मुंबई खंडपीठाच्या निर्देशानुसार प्रशासक नियुक्त करणे क्रमप्राप्त आहे.

## ३७८ हज यात्रेकरूंची आरोग्य तपासणीतभा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ जानेवारी :** हज यात्रेकरूंच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी डीईआयसी केंद्र, स्त्री रुग्णालय लातूर येथे २७ ते ३० जानेवारीदरम्यान आरोग्य तपासणी व लसीकरण शिबीर घेण्यात आले. हज कमिटी ऑफ इंडिया आणि हज कमिटी ऑफ महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनूसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आलेल्या शिबिरात ३७८ जणांची आरोग्य तपासणी व लसीकरण करण्यात आले. या शिबिरात वैद्यकीय अधीक्षक डॉ. रवींद्र भालेराव, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, डॉ.आनंद कलमे, डॉ. मुक्तदिर शत्तारी आदी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हज यात्रेकरूंची तपासणी व आवश्यक लसीकरण करण्यात आले.शिबिरामध्ये लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, नळेगाव, निलंगा आदी भागातील एकूण ३७८ हज यात्रेकरूंनी आरोग्य सेवांचा लाभ घेतला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी लातूर जिल्ह्याचे हज प्रशिक्षक अमीरपाशा मणियार, गयास शेख, इस्माईल शेख, डीआयसीचे व्यवस्थापक अलीम नदाफ, आरबीएसके टीम, महानगरपालिका आरोग्य कर्मचारी, स्त्री रुग्णालय व डीईआयसी केंद्रातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.